www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ माझी वसुंधरा अभियानची अंमलबजावणी कोकण विभागात अधिक प्रभावीपणे करावी...

पान ३ वर....


# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ




■ बाटलीबंद पाणी आरोग्यासाठी

पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८३ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, बुधवार, ०४ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात



### ताजमहालला बॉम्बने उडवण्याची धमकी

**आग्रा :** जग प्रसिद्ध असलेल्या ताजमहालला बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली आहे. त्यामुळे पोलीस विभागात एकच खळबळ उडाली आहे. धमकीचा ईमेल मिळाल्यानंतर ताज येथील पोलिसांना सतर्क करण्यात आले आहे. या ईमेल नंतर सुरक्षा यंत्रणा तातडीने घटनास्थळी पोहचली आहे. आता ताजमहलच्या सुरक्षा व्यवस्थेमध्ये वाढ करण्यात आली आहे. आग्रा पोलिस सध्या मेल कुठून आला याचा तपास करत आहेत. एसीपी ताज सिक्योरिटी सईद अरीब अहमद यांनी पीटीआयला माहिति देताना यासंदर्भात सांगितले की, पर्यटन विभागाला एक ईमेल आला होता. त्या आधारे ताजगंज पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजूनही तपास सुरू आहे. ईमेलनुसार अद्याप असे कोणतेही इनपुट मिळालेले नाही. मात्र, सुरक्षा लक्षात घेऊन बॉम्ब निकामी पथक, शोध श्वान आणि इतर पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत.

### मुंबई-गोवा महामार्गावर परशुराम घाटात मोठा अपघात



**चिपळूण -** जखमींना उपचारासाठी तातडीने जवळच्या खेड आणि चिपळूण मधील रुग्णालयात हलविण्यात आले आहे. एमआईडीसी मधून शिफ्ट संपवून कर्मचाऱ्यांना घरी नेणाऱ्या बसवर, कंटेनर पलटी झाल्यामुळे कर्मचारी जखमी झाले आहेत. या अपघातानंतर घाटात वाहतुकीचा खोळंबा झाला आहे. वारंवार होणाऱ्या या अपघातामुळे परशुराम घाटातील वाहतुकीचा प्रश्न एरणीवर आहे. अश्या परिस्थितीत वाहन चालक सध्या जीव मुठीत धरून प्रवास करीत आहेत.

### महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई शहरात 'ड्राय डे' जाहीर



**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने ६ डिसेंबर २०२४ रोजी मुंबई शहर जिल्ह्यातील ठोक व किरकोळ देशी, विदेशी मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद ठेवण्यात येणार आहेत.

राज्य उत्पादन शुल्कच्या एफ विभागाचे निरीक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अबकारी अनुज्ञप्त्या ५ डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजेपासून ते दि. ६ डिसेंबर रोजी संपूर्ण दिवस बंद राहणार आहेत, असे आदेश मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांनी दिले आहे. आदेशाची अंमलबजावणी न केल्यास अनुज्ञप्तीधारकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त

# चैत्यभूमी येथील सोयी-सुविधांचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतला आढावा



● मुंबई, विशाल पाटील

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यासाठी देशभरातून लाखो अनुयायी चैत्यभूमी येथे येतात. त्यांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन संबंधित सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले. दरम्यान, महापरिनिर्वाण दिनानिमित्त ६ डिसेंबर रोजी मुंबईत स्थानिक सुटी जाहिर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे येणाऱ्या अनुयायांसाठी करावयाच्या सोयी सुविधांचा आढावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे घेतला. या बैठकीस माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

पान २ वर

## भाजपचा कारभार म्हणजे वधू वराचा पत्ता नाही पण हॉल बुकींग सुरु आहे - अनंत गाडगीळ यांचा टोमणा


● मुंबई, यश सावंत :



विधानसभेच्या निवडणूका होऊन १० दिवस उलटले तरी अजूनही भाजप नेता निवडू शकलेली नाही. लोकशाही प्रथेप्रमाणे निकालांनंतर बहुमतवाला पक्ष नेता निवड करतो. त्यांनतर सदर नेता राज्यपालांची भेट घेऊन बहुमताचा पुरावा देतो. त्या अनुषंगाने राज्यपाल सरकार स्थापन करण्यासाठी बहुमत असलेल्या पक्षाच्या नेत्यास आमंत्रित करतात त्यांनतर शपथविधी होतो.महाराष्ट्रात प्रथा तर सोडाच पण ही प्रक्रीयाही सुरु होण्यापूर्वीच भाजपचेच अध्यक्ष शपथविधीची तारीख जाहीर करतात. ह्यातुन एकाधिकारीशाही, संविधानाची पायमल्ली, लोकशाही प्रथांचे विसर्जन याचे प्रतिबिंब दिसून येते. ही देशाच्या आणि लोकशाहीच्या दृष्टीने धोकादायक बाब आहे.

## पालघरमधील शालेय आहारात सापडल्या अळ्या!

● पालघर, सुचिता सोनावणे:



पालघर जिल्ह्यात एका शाळेतील पोषण आहारात (मिलेट बार) अळी आणि बुरशी आढळल्याच्या घटनेने सर्वत्र खळबळ उडाली होती. या प्रकरणातील वस्तूस्थितीचा आढावा विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी घेतला. त्यांनी सोमवार, दि. २ डिसेंबर २०२४ रोजी आपली टीम पालघरमधील जिल्हा परिषद कार्यालयात पाठवून चौकशी सुरू केली. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र शिंदे आणि शिक्षणाधिकारी सोनाली मातेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या मुलांना हे मिलेटबार देण्यात येतात. रागी, ज्वारी आणि बाजरी या तीन धान्यांपासून हे प्रोटीन बार बनलेले आहेत. या प्रकरणाचा पंचनामा केलेला आहे, त्याचबरोबर शाळा व्यवस्था समितीशीही याबाबत बोलणं झालेलं आहे असे त्यांनी सांगितले.

पान २ वर

# आता शेवटचा गड वाचवण्यासाठी ठाकरे लागले कामाला

## मुंबईतील शिलेदारांना मातोश्रीवर बोलावलं

● मुंबई, विशाल कारंडे :



आपला शेवटचा गड वाचवण्यासाठी उद्धव ठाकरे हे कामाला लागले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई महानगरपालिकेवर शिवसेनेचा भगवा फडकत आहे. मात्र, यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजप आणि महायुतीला मिळालेल्या प्रचंड यशामुळे शिवसेनेचा अभेद्य किल्ला अशी ख्याती असलेल्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत काय होणार, याकडे साऱ्यांच्या नजरा लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर आता उद्धव ठाकरे यांनी मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली आहे. त्यासाठी मुंबईतील शिवसेना नगरसेवकांना मंगळवारी मातोश्रीवर बोलवण्यात आले आहे.

विधानसभेच्या धक्क्यानंतर ठाकरेंच्या शिवसेनेची मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी स्वबळाची चाचपणी सुरु असल्याची माहिती आहे. विधानसभा निवडणुकीत बसलेल्या फटक्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेनं मुंबई महापालिका निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. मुंबईतील सर्व ३६ विधानसभा मतदारसंघातील २२७ प्रभागात तयारीला सुरुवात केली आहे. ठाकरेंच्या शिवसेनेच्या मुंबईतील आमदारांसह नेते, सचिव आणि संघटकांची नियुक्ती करण्यात आली आहे. विनायक राऊत, अनिल परब, मिलिंद नार्वेकर, वरुण सरदेसाई, सुनील राऊत, बाळा नर, सुनील शिंदे, अमोल कीर्तिकर यांच्यासह एकूण १८ जणांची टीम प्रत्येकी दोन विधानसभेतील बारा प्रभागांचा आढावा घेणार आहे. पुढील आठवडाभरात हा अहवाल तयार करून पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना सोपवला जाईल. अहवालाच्या आधारावर महापालिकेच्या जागांची वर्गवारी करुन ठाकरे गटाकडून निवडणुकीचा पुढचा आराखडा निश्चित केला जाईल.

पान २ वर

## भारत-आफ्रिका व्यापार केंद्र प्रकल्प खारघरमध्ये



### महत्त्वाकांक्षी आणि रोजगारनिर्मितीला हातभार लावणारा प्रकल्प

● नवी मुंबई, धनश्री सट्टा :

भारत आणि आफ्रिकी देशांमध्ये आंतरखंडीय व्यापार तसेच सामाजिक-आर्थिक आघाड्यांवर नवा सेतू निर्माण करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून नवी मुंबईतील खारघर उपनगरात भारत-आफ्रिका व्यापार केंद्र उभारणीच्या हालचालींना वेग आला आहे. सिडकोमार्फत या भागात उभारण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रातील २५ ते ३५ एकराचा विस्तीर्ण भूखंड भारत-आफ्रिका व्यापार केंद्रासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय सिडकोने घेतला आहे. आफ्रिका-इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशन (एआयईएफ) या संस्थेमार्फत हे केंद्र विकसित करण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनासोबत यापूर्वीच या संस्थेचा द्विपक्षीय करार झाला असून या कराराचा भाग म्हणून हे केंद्र खारघर भागात उभारण्याचे ठरविण्यात आले आहे. या केंद्राच्या माध्यमातून पाच हजार थेट रोजगार उपलब्ध होईल असा दावा केला जात असून आफ्रिकेतील ५५ देशांसोबत थेट उद्योग आणि व्यापार संबंध जोडणारा एक मोठा दुवा या केंद्राच्या माध्यमातून निर्माण केला जाणार आहे.

पान २ वर

## देवगड समुद्रात कर्नाटकच्या हायस्पीड ट्रॉलर्सवर अनधिकृत मासेमारी संदर्भात कारवाई

● सिंधुदुर्ग, दिगंबर जाधव :



देवगड समुद्राच्या नस्तावर १२ वाव पाण्यात अनधिकृत मासेमारी करणाऱ्या कर्नाटक मलपी येथील हनुमा तीर्था या हायस्पीड बोटीवर सोमवारी रात्री ११ वा कारवाई करण्यात आली. यावेळी बोट जप्त करून देवगड बंदरात आणून मासळीचा लिलाव करण्यात आला. देवगड समुद्रात गेली अनेक दिवस परप्रांतीय बोटींनी धुमाकुळ घातल्याने स्थानिक मच्छिमारांच्या बोटींना मासळी मिळत नव्हती. बाहेरील बोटी किनाऱ्याला येऊन मासेमारी करीत होते. सोमवारी मत्स्यव्यवसाय विभागाच्या गस्तीच्या वेळी रात्री ११ वा सुमारास देवगड समुद्राच्या नस्ताच्या ठिकाणी येऊन अनधिकृत मासेमारी करताना मलपी कर्नाटक येथील दिनेश कुंदर यांच्या मालकीची 'हनुमा तीर्था' ही बोट आढळून आली. मत्स्य विभागाने या बोटीला थांबण्याचा इशारा केला मात्र बोट जाळी टाकून पोबारा करण्याच्या तयारीमध्ये होती. याचवेळी मत्स्य विभागाच्या सागर सुरक्षा रक्षकांनी त्या बोटीवर उड्या मारून बोटीचे स्टेरिंग हाती घेत बोट ताब्यात घेतली.

# शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात आढावा बैठक संपन्न

## बैठक घेणारा ठाणे जिल्हा राज्यात पहिला

● ठाणे, रोहित जैसवाल :

**बदलापूर येथील शालेय अल्पवयीन मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेनंतर जिल्ह्यातील शाळांनी बालकांच्या संरक्षणासाठी कोणत्या खबरदारी घेतल्या आहेत हे जाणून घेण्यासाठी ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीनिवास ब्रि. अग्रवाल यांच्या आदेशाने व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव ईश्वर कां. सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली.**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करून त्याअन्वये बालकांच्या सुरक्षिततेबाबत नियमावली बनवली असून त्या अनुषंगाने शासन निर्णय पारीत केला आहे. ही नियमावली केवळ कागदावरच राहू नये, त्याची अंमलबजावणी होण्याच्या उद्देशाने न्यायाधीश तथा सचिव ईश्वर सूर्यवंशी, मुख्य न्याय दंडाधिकारी एस. के. फोकमारे, ठाणे जिल्हा महिला बाल कल्याण अधिकारी महेंद्र गायकवाड, पोलीस गुन्हे शाखेचे सहायक आयुक्त राजकुमार डोंगरे, सरकारी वकील संजय मोरे आणि ठाणे जिल्ह्यातील सर्व महानगरपालिका व जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी, गट शिक्षण अधिकारी, संस्था प्रतिनिधी आणि मुख्याध्यापक संघाचे प्रतिनिधी यांच्यासह आढावा बैठक घेण्यात आली. या विषयाबाबत बैठक घेणारा ठाणे जिल्हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे.



बालसुधारगृहांमधील बाल आरोपींमध्ये पोस्कोच्या गुन्ह्यातील बालकांची संख्या लक्षणीय आहे. हे चिंताजनक चित्र बदलायचे असेल तर ते शिक्षकच बदलू शकतात. मोबाईलच्या माध्यमातून पॉर्न संस्कृतीत गुंतत चाललेल्या बालकांना तेच यातून बाहेर काढू शकतात, असा विश्वास ठाणे न्यायालयाचे मुख्य न्याय दंडाधिकारी एस.के. फोकमारे यांनी व्यक्त केला.

ज्ञानदानाचे काम करणाऱ्या शैक्षणिक संस्थांमध्ये आता बालकांच्या लैंगिक अत्याचाराच्या वाढत्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असल्याचे गुन्हे शाखेचे सहायक पोलिस आयुक्त राजकुमार डोंगरे यांनी सांगितले.

जिल्हा विधि सेवा प्राधिकरणाचे सचिव न्या. ईश्वर सूर्यवंशी यांनी बैठकीला उपस्थित असलेल्या शिक्षण अधिकारी, प्राथमिक व माध्यमिक गटशिक्षण अधिकाऱ्यांकडून शालेय सुरक्षेचा आढावा घेतला. त्याचबरोबर या आढाव्यात शाळेशी निगडीत सर्व लोकांना कायदे व बालकांच्या हक्कांचे संरक्षण याविषयी प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

पान २ वर



## दिल्ली सीमेवरुन आंदोलनकारी शेतकऱ्यांना हुसकावण्यात आले

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

नोएडा येथे शेतकऱ्यांनी पुन्हा आंदोलन सुरु केले आहे. नोएडा येथील दलित प्रेरणास्थळावर सोमवारपासून शेतकरी अनिश्चितकाळासाठी आंदोलनासाठी ठिय्या मारुन बसलेले होते. परंतू मंगळवारी या शेतकऱ्यांवर जोरदार कारवाई करण्यात आली असून १६० हून शेतकऱ्यांना अटक करण्यात आली आहे. या आधी दलित प्रेरणा स्थळावर मोठा पोलिसी फौजफाटा तैनात करण्यात आला होता.या दरम्यान शेतकऱ्यांच्या आंदोलनामुळे ग्रेटर नोएडा हायवेवर अनेक किलोमीटरची वाहतूक कोंडी झाली. नोएडाच्या सेक्टर ९५ येथील दलित प्रेरणा स्थळाजवळ शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन सुरु होते. या आंदोलकांत अचानक गोंधळ माजला आहे, कारण मोठ्या संख्येने जमलेले शेतकऱ्यांना पकडून पोलिसांना वाहनात कोंबले.

पान २ वर

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे


# संकटांची मालिका

मणिपूरला सध्या स्थानिक पातळीवर कुकी आणि मैतेई दरम्यान संवाद सुरू करणे अत्यावश्यक आहे. चर्चेची द्वारे खुली केल्याशिवाय हा वांशिक संघर्ष आटोक्यात येणार नाही. केंद्राने केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या अतिरिक्त ५० तुकड्या मणिपूरमध्ये तैनात करण्याची घोषणा केली आहे. मणिपूरला सध्या सुरू असलेला हिंसाचार थांबवण्यासाठी ५ हजारांहून अधिक अर्धसैनिक आणले आहेत. मणिपूरमधील गेल्या काही दिवसांतील घटनांमुळे आधीच्या जखमांवरील खपल्या निघून रक्त पुन्हा वाहू लागले आहे. त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज आहे. ज्या क्रूरपणे तेथील प्रतिस्पर्धी जमाती परस्परांचे जीव घेण्यास तयार आहेत, ते पाहता शांतता प्रस्थापित होण्यामध्ये अजून बराच काळ लागणार आहे. दहा कुकी बंडखोरांनी केंद्रीय राखीव पोलीस दल आणि पोलिसांवर हल्ला केला आणि प्रत्युत्तरादाखल झालेल्या गोळीबारात त्यांचा मृत्यू झाला. या कुकींचे शवविच्छेदन अहवाल दडवले जात असल्याचा आरोप करत कुकींनी रुग्णालयासमोर आंदोलन केले.

जिरबामसह आणखी काही पोलीस ठाणी आता लष्करी विशेषाधिकार कायद्याच्या (अफ्स्पा) कक्षेत आणण्याची अधिसूचना १४ नोव्हेंबर रोजी करण्यात आली. हिंसाग्रस्त जिरिबाम जिल्ह्यातून गेल्या आठवड्यात बेपत्ता झालेल्या तिघांचे मृतदेह सापडल्यानंतर नागरिकांमध्ये उसळलेल्या संतापाचे लोण राजधानी इम्फाळपर्यंत पसरले. मृतांना न्याय मिळण्याची मागणी करणार्या संतप्त निदर्शकांनी तीन मंत्री आणि सहा आमदारांच्या निवासस्थानांना लक्ष्य केले. त्यानंतर प्रशासनाने इम्फाळ खोर्यात संचारबंदी लागू केली व इंटरनेट सेवा बंद करण्यात आली. दरम्यान, मणिपूरमध्ये नॅशनल पीपल्स पार्टीने बिरेन सिंग सरकारचा पाठिंबा काढून घेतला आहे. एनपीपीने म्हटलं आहे की, आम्हाला वाटतं की बिरेन सिंग यांच्या नेतृत्वाखालील मणिपूर राज्य सरकार संकटाचे निराकरण करण्यात आणि सामान्य स्थिती पूर्ववत करण्यात अपयशी ठरलं आहे. मणिपूर विधानसभेत बिरेन सिंग यांच्याकडे बहुमत आहे. त्यामुळे एनपीपीने जरी पाठिंबा काढला तरी सरकारला कोणताही धोका नाही.

स्थानिकांच्या वांशिक हिंसाचारात होरपळणार्यांना वाचवण्यासाठी उभ्या केलेल्या सरकारी आश्रय छावण्यांतील निर्वासितांचाही बळी पडत असेल, तर त्यावरून तेथील परिस्थितीचे गांभीर्य लक्षात येते. संरक्षण दलाच्या कारवाईत काही मारले गेले आणि वर त्यातील काहींना 'दहशतवादी' ठरवण्याचा प्रयत्न झाला. ते कुकी जमातीचे सरंक्षण करण्याकरता उभारलेले ग्रामरक्षक दलाचे शस्त्रधारी होते. त्यामुळे स्थानिक आणखीच संतापले आणि मुख्यमंत्री, अन्य काही नेत्यांच्या घरांवर जमाव चालून गेला. आजही कुकी आणि मैतेई या परस्परांविरोधात उभ्या ठाकलेल्या जमातींचे 'स्वयंसेवक' विरोधी नागरिकांवर, महिलांवर खुलेआम अत्याचार करताना दिसतात. ते रोखण्याची इच्छा आणि क्षमता राज्य सरकारात नाही. गतसाली सुरू झालेल्या हिंसाचारात तेथील कुकी आणि मैतेई समाजाच्या गटांनी सरकारी शस्त्रागारे लुटली. असे करणार्या सर्वांना शासन करणे हे राज्य सरकारचे कर्तव्य आहे. पण राज्य सरकार मैतेई 'आपले' म्हणून मैतेईस अभयदान देत आहे. त्यामुळे या मैतेई पोलीस कुकस टिपत आहेत आणि त्याचा बदला म्हणून कुकी बंडखोर / शस्त्रधारी मैतेईना मारत आहे. सरकारी कर्मचायांतही हा दुभंग उफाळून आला आणि या दोन समाजाच्या कर्मचायांनी परस्परविरोधी भागांत काम करण्यास नकार दिला आहे. मणिपुरातील मुख्यमंत्री बीरेन सिंह हे यास जबाबदार आहेत. मणिपुरातील कुकी आणि मैतेई समस्येचा त्यांनी पार खेळखंडोबा केलेला आहे. ते उघडपणे मैतेईंची बाजू घेताना दिसतात आणि आपल्याच राज्यातील कुकी आणि झो समुदायांस वार्यावर सोडण्यात त्यांना काहीही गैर वाटत नाही. आता तर परिस्थिती इतकी हाताबाहेर गेलेली आहे की, जेथे कुकी समाजाचे प्राबल्य आहे तेथे खोयांच्या प्रदेशात मैतेई जाण्यास तयार नाही. मणिपुरी सरकारी कर्मचारी कुकी असेल, तर तो मैतेईंचे प्राबल्य असलेल्या प्रदेशांत सरकारी सेवेस तयार नाही. तिथल्या महिला संघटनांनी अनेक वेळा लष्कराने चालवलेली ऑपरेशन्स थांबवली आहेत आणि कित्येक वेळा लष्कराने पकडलेल्या लोकांना सोडून द्यावे लागले आहे. हे आंदोलक इतके निर्धास्त झाले की, शांतता प्रस्थापित करण्यास पाचारण केलेल्या लष्करावरही तिथल्या महिलांनी हात उचलला.

## आजची चित्रोळी



कष्टापेक्षा सावध जगणें
वनांत आम्हां गरजेचे !
संकट आ वासूनच असतें
सावध जगणे सौख्याचे !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# भारतीय नौदल दिन

आज भारतीय नौदल दिन. भारतीय नौदलातर्फे दरवर्षी ४ डिसेंबर हा दिवस भारतीय नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्याआधीचा पूर्ण सप्ताह हा देशभरात नौदल सप्ताह म्हणून साजरा केला जातो. ४ डिसेंबर याच दिवशी नौदलदिन का साजरा केला जातो हे जाणून घेऊया. १९७१ सालच्या सुरवातीपासूनच भारत आणि पाकिस्तानमध्ये कमालीचा तणाव निर्माण झाला होता. तत्कालीन पूर्व पाकिस्तान मधून पाकिस्तानी हवाईदल सातत्याने भारतीय हद्दीत घुसखोरी करत होते. भारताने अनेकदा इशारे देऊनही पाकिस्तान आपली खोड मोडायला तयार नव्हते. १९७१ च्या एप्रिल महिन्याच्या सुमारासच युद्ध पुकारण्यासदृश परिस्थिती निर्माण झाली होती. पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी या पार्श्वभूमीवर सैन्य दलांच्या अधिकाऱ्यांची बैठक बोलावली या बैठकीला मंत्रिमंडळातील सर्व सदस्य उपस्थित होते. लष्करप्रमुख सॅम माणेकशॉ यांनी या बैठकीत स्पष्ट सांगितले की सध्याची परिस्थिती आणि ऋतू हे आपल्यासाठी अनुकूल नसल्याने सध्यस्थितीत युद्ध आपल्याला परवडणारे नाही. युद्धासाठी नोव्हेंबर पर्यंत थांबावे लागेल.

नोव्हेंबर पर्यंत सैन्याची जुळवाजुळव व्यवस्थित करता येईल याची खात्री देण्यासही ते विसरले नाही. खरंतर एप्रिलमध्येच युद्ध व्हावे या मताच्या इंदिरा गांधी होत्या पण लष्करप्रमुखांनी परिस्थिती विषद केल्यानंतर नोव्हेंबर पर्यंत थांबण्याचा निर्णय पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाने घेतला. त्यामुळे आपण काहीही केले तरी भारत आपल्याला उलट उत्तर देऊ शकणार नाही अशा आविर्भावात पाकिस्तान वावरू लागला. त्यांनी ३ डिसेंबर रोजी भारतीय सीमाभागावर पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानातून जोरदार हल्ले चढवले.



त्याचवेळी भारतीय विमानवाहक युद्धनौका आयएनएस विक्रांतला सागरतळात बुडवण्याची योजना पाकिस्तानने आखली. पाकिस्तानची ही योजना भारतीय नौदलाच्या लक्षात आल्याने भारतीय नौदलाने चुकीचा संदेश पाठवून पीएनएस गाझी ची दिशाभूल केली आणि डाव साधला. भारतीय नौदलाने चढवलेल्या हल्ल्यात गाझी या पाकिस्तानच्या पाणबुडीला जलसमाधी मिळाली.

भारताच्या आयएनएस विक्रांतला सागर तळाशी पाठवण्याची स्वप्ने पाहणाऱ्या पाकिस्तानी नौदलाची सर्वात शक्तिशाली असलेली गाझी ही पाणबुडीच सागर तळाशी पोहचल्याने पाकिस्तानला मोठा धक्का बसला. गाझी पाणबुडीला जलसमाधी मिळाल्यानंतर बंगालच्या उपसागरात आयएनएस विक्रांतने आपला दरारा पसरवला आणि पाकिस्तानी नौदलाचे कंबरडे मोडून काढले. आयएनएस विक्रांतवरील धावपट्टीचा वापर करत नौदलाच्या लढाऊ विमानांनी हल्ला चढवून पूर्वेकडे पाकिस्तानला डोकेही वर काढू दिले नाही. हे सुरू असतानाच पश्चिमी मुख्यालयाच्या नौदल ताफ्याने धाडसी नियोजन करुन लहान आकाराच्या नौकांच्या मदतीने छुप्या पद्धतीने पाकिस्तानी सागरी हद्दीत प्रवेश करत थेट कराची बंदरावरच हल्ला चढवला.

पाकिस्तानी युद्धनौका, पाणबुड्या त्यांच्यावरील या अचानक झालेल्या हल्ल्याने हादरुन गेल्या. कराची बंदरावर थेट हल्ला होऊ शकतो, याची कल्पनाच पाकिस्तानी नौदलाने केली नव्हती. ३ व ४ डिसेंबरच्या मध्यरात्री भारतीय नौदलाने केलेल्या या हल्ल्याने पाकिस्तानचे कंबरडे मोडले आणि युद्धाचे पारडे भारताच्या बाजूने झुकले. त्यानंतर दहा दिवसांतच पाकिस्तानने शरणागती पत्करली. नौदलाच्या या पराक्रमाची आठवण म्हणून ४ डिसेंबर हा दिवस नौदल दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानंतर भारतीय नौदलाचा जगभरात दबदबा निर्माण झाला. अरबी समुद्र, बंगालचा उपसागर आणि दक्षिण महासागरात भारतीय नौदलाचे सामर्थ्य निर्माण झाले. आज भारतीय नौदल हे जगातील सर्वाधिक शक्तिशाली नौदल म्हणून ओळखले जाते. आज भारताचे नौदल हे जगातील पाचव्या क्रमांकाचे नौदल आहे. भारतीय नौदलाकडे एकूण ५५ युद्धनौका आणि ५८ हजार ३५० सैनिक आहेत. भारताकडे ९ विध्वंसक, १५ नौका, न्यूक्लिअर हल्ला करणारी एक पाणबुडी, १४ पारंपरिक पाणबुडीसह आधुनिक शस्त्रे आहेत म्हणूनच जगातील सर्वात शक्तिशाली नौदलामध्ये भारतीय नौदलाची गणना होते. भारतीय नौदलाला नौदल दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**श्याम बसप्पा ठाणेदार, पुणे**

## पान १ वरून...

### ▶▶| शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसंदर्भात आढावा...

तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याचे पोलीस पडताळणी प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे, बालकांच्या संबंधी निवासी व अनिवासी संस्थांमध्ये पोलीस विभागाकडून पर्यवेक्षण होणे आवश्यक आहे, शाळांमध्ये सी.सी.टी.व्ही व त्यांचे एक महिनाभराचे बॅकअप जतन असणे गरजेचे आहे, शालेय स्टाफला व मुलांना सायबर गुन्ह्यांबाबत सावधगिरीचे प्रशिक्षण देण्यात यावे. तसेच शाळांमध्ये पायाभूत सुविधा दिल्या जातात की नाही यावर शासकीय शालेय विभागाचा अंकुश हवा, तसेच प्रत्येक शाळेमध्ये सर्व विद्यार्थ्यांना "गुड टच, बॅड टच" बाबत प्रशिक्षण देण्याचे गरजेचे आहे व यासाठी सामाजिक संस्थांची देखील मदत घेण्याचे आवाहन केले.

त्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांपर्यंत हे प्रशिक्षण पोहोचले की नाही याची खातरजमा करणे गरजेचे आहे, याचबरोबर संबंधित शैक्षणिक विभाग यांनी वारंवार शाळांना भेट देवून शासन निर्णयाची अंमलबजावणी होते किंवा नाही याची पडताळणी करून अहवाल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे सादर करण्याचे निर्देश श्री. सुर्यवंशी यांनी यावेळी दिले.

यावेळी ठाणे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्री. गायकवाड यांनी शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत शिक्षक आणि विद्यार्थी या दोन्हींचे प्रशिक्षण शिबिर घेणे अत्यावश्यक असून या विषयासंदर्भात कोणालाही काहीही मदत अथवा मार्गदर्शन हवे असल्यास महिला व बालविकास विभागाशी संपर्क साधण्याबाबत आवाहन केले.

### ▶▶| आता शेवटचा गड वाचवण्यासाठी...

मुंबई महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने आजची बैठक आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकासुद्धा आता राज्य सरकारला लावाव्या लागणार आहेत. त्यासाठी निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. या निरीक्षकांवर नेमकी काय जबाबदारी असेल, याबाबत उद्धव ठाकरे मार्गदर्शन करतील. मुंबई महापालिकेत महाविकास आघाडी सोबत न जाता एकट्याने लढायचं का ? याचा निर्णय उद्धव ठाकरे घेतील, असे ठाकरे गटाचे माजी खासदार विनायक राऊत यांनी सांगितले.

ठाकरेंच्या कोणत्या नेत्याकडे कोणत्या विभागाची जबाबदारी?

विनायक राऊत - कुर्ला, विक्रोळी
अनिल परब - मलबार हिल, कुलाबा
मिलिंद नार्वेकर - माहिम, शिवडी
वरुण सरदेसाई - कलिना, वांद्रे पश्चिम
विश्वनाथ नेरुरकर - विलेपार्ले, चांदिवली
रवींद्र मिर्लेकर - वांद्रे पूर्व, वरळी
अमोल कीर्तीकर - दहिसर, मागठाणे
दत्ता दळवी - जोगेश्वरी पूर्व, दिंडोशी
सुनील राऊत- वडाळा, भायखळा
सुनील शिंदे- मुलुंड, भांडुप पश्चिम
बाळा नर - चारकोप, मालाड पश्चिम
बबनराव थोरात - अंधेरी पूर्व,अंधेरी पश्चिम
शैलेश परब - बोरिवली, कांदिवली पूर्व
उद्धव कदम -धारावी सायन कोळीवाडा
विलास पोतनीस- वर्सोवा, गोरेगाव
सुहास वाडकर - घाटकोपर पश्चिम, घाटकोपर पूर्व
शैलेश फणसे - मानखुर्द शिवाजीनगर, मुंबादेवी
संजय घाडी - अणुशक्ती नगर,चेंबूर

### ▶▶| भारत-आफ्रिका व्यापार केंद्र प्रकल्प...

सन २०२० मध्ये झालेल्या आफ्रिकन शिखर परिषदेत यासंबंधी प्रस्ताव पुढे आणण्यात आला होता. आफ्रिका-इंडिया इकॉनॉमिक फाऊंडेशन आणि महाराष्ट्र सरकार दरम्यान २०२३ मध्ये यासंबंधी द्विपक्षीय करार करण्यात आला होता. भारतीय तंत्रज्ञान, कौशल्य, तंत्रज्ञांची आफ्रिकेतील देशांसोबत देवाणघेवाण तसेच उद्योग, व्यापार आणि पर्यटनाच्या आघाडीवर नवा सेतू स्थापन करणे हे या केंद्राचे वैशिष्ट्य असणार आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक वाढीस या केंद्रामुळे उत्तेजना मिळण्याचा दावा केला जात असून मुंबई महानगर क्षेत्रातील आर्थिक विकासालाही यामुळे चालना मिळू शकणार आहे.

दरम्यान, यासंबंधी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांची प्रतिक्रिया उपलब्ध झाली नाही. सिडकोच्या जनसंपर्क अधिकारी प्रिया रतांबे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी याविषयी माहिती घेऊन सविस्तर कळविण्यात येईल, असे उत्तर दिले.

सिडकोने खारघर येथे आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्राच्या निर्मितीसाठी जागा राखीव ठेवली आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापासून लगतच्या अंतरावर असलेल्या या ठिकाणी जगभरातील वेगवेगळ्या देशांना व्यापार केंद्राच्या उभारणीसाठी भूखंड दिले जाणार असून हे संपूर्ण क्षेत्र भविष्यात देशातील सर्वात मोठे व्यापार केंद्र म्हणून विकसित करण्याचा सिडको आणि राज्य सरकारचा प्रयत्न आहे. भारत-आफ्रिका व्यापार केंद्रासाठी राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने सिडकोला जागा निश्चित करण्याच्या सूचना दिल्या होत्या. एआयईएफ आणि सिडकोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमध्ये झालेल्या बैठकांनुसार मुंबई-गोवा महामार्गालगत 'नैना' अधिसूचीत क्षेत्रात असलेल्या शिरढोण भागातही या केंद्राच्या उभारणीसाठी जागेची चाचपणी करण्यात आली होती. अखेर खारघर येथील नियोजित आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रातच भारत-आफ्रिका व्यापार केंद्राच्या उभारणीसाठी जागा निश्चित केली जावी, असे ठरविण्यात आले. त्यानुसार एआयईएफ या संस्थेने याच भागात २५ ते ३५ एकर क्षेत्रफळावर नव्या केंद्राच्या उभारणीसाठी जागानिश्चिती केली जावी असा प्रस्ताव सिडकोपुढे ठेवला होता. या प्रस्तावास सिडकोने मंजुरी दिली असून या भूखंड वाटपाचा अंतिम प्रस्ताव राज्य सरकारच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे, अशी माहिती सिडकोतील वरिष्ठ सूत्रांनी लोकसत्ताला दिली.

### ▶▶| चैत्यभूमी येथील सोयी-सुविधांचा...

मुख्य सचिव सुजाता सौनिक, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के.गोविंदराज, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग, सामाजिक न्याय विभागाचे सचिव विजय वाघमारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते, कोकण विभागीय आयुक्त डॉ.राजेश देशमुख, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांच्यासह संबंधित विविध यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यांसह पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, भदंत डॉ.राहुल बोधी, संबंधित विविध यंत्रणांचे अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले की, बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांची संख्या दरवर्षी वाढत आहे. त्यांना भोजन, स्वच्छ आणि पुरेशी स्वच्छतागृहे, वैद्यकीय सुविधा, राहण्याची सुविधा, वाहतूक व्यवस्था, मदत आणि समन्वय कक्ष, सुरक्षा व्यवस्था आदी सोयी सुविधा पुरविण्यात येतात. या सुविधा पुरविताना कोणत्याही अनुयायाची गैरसोय होणार नाही, याची सर्व संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

महापरिनिर्वाण दिनाशी संबंधित सर्व समित्यांचे नेहमीच सहकार्य राहिले आहे, त्यांच्या सूचनांची दखल घेऊन सर्व कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत. हेलिकॉप्टरच्या माध्यमातून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्याचे नियोजन करण्यात यावे. परिसरात पूर्ण स्वच्छता राखण्यात यावी. विविध रेल्वे स्थानकांवर मदत कक्ष उभारण्यात यावेत, अशा सुचनाही मुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी यावेळी दिल्या.

माजी उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यावेळी म्हणाले की, दरवर्षी चांगली सुविधा देण्यात येते. यावर्षीही कोणतीही कमतरता राहणार नाही, यासाठी सर्वांनी समन्वयाने प्रयत्न करावेत. भोजन, आरोग्य, पाणी, स्वच्छता तसेच सुरक्षा आदी सुविधा दर्जेदार द्याव्यात. स्थानिक समित्यांचे नेहमीच सहकार्य राहते. त्यांच्या सूचनांही योग्य प्रकारे अमलात आणाव्यात. संवेदनशीलता ठेवून चांगल्या प्रकारे नियोजन करावे.

मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी प्रारंभी चैत्यभूमी परिसरात आजपर्यंत झालेल्या सोयी सुविधांच्या कामांचा आढावा घेतला. ज्येष्ठ व्यक्तींना रांगेत बसण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी, ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची सोय असावी, यासाठी परिसरातील गुरूद्वारांना आवाहन करावे, त्याचप्रमाणे रेल्वेस्थानकावरून चैत्यभूमीपर्यंत बसची शटल सेवा सुरू ठेवावी असे निर्देश त्यांनी दिले. यासह दिशादर्शक फलक, रात्री पुरेशा लाईटची सुविधा, रेल्वेस्थानक परिसर अनधिकृत फेरीवालेमुक्त करणे, जीवरक्षक बोटींची व्यवस्था, पाण्याच्या टँकर्सची व्यवस्था, वैद्यकीय पथके, समन्वय कक्ष आदी बाबींचा त्यांनी आढावा घेतला.

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त श्री.गगराणी, कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसाळकर, पश्चिम रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक, आदींनी त्यांच्या यंत्रणांमार्फत करण्यात आलेल्या सुविधांची माहिती दिली. भदंत डॉ.बोधी, महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे आदींनी शासनामार्फत करण्यात येत असलेल्या सोयी सुविधांबाबत समाधान व्यक्त करून सर्वांचे आभार मानले.

### ▶▶| पालघरमधील शालेय आहारात सापडल्या...

तसेच अन्न आणि औषध प्रशासनाने चिंचणी शाळा क्रमांक. ३ ला भेट देत प्रोटीन बारचे एकूण सात सॅम्पल तपासणीसाठी लॅबमध्ये पाठवले आहेत. सात खोक्यामध्ये 1300 मिलेट बार आहेत. यावेळी वाडा तालुक्यातील खानिवली येथील शाळांमध्येही त्यांनी तपासणी केली.

या प्रकरणाबाबत बोलताना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी, "हा प्रकार महिला आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून संवेदनशील असल्याचे म्हटले. ग्रामीण क्षेत्रात बहुतेक मुलं या आहाराच्या आधारेच उदरनिर्वाह करीत असतात. त्यांना हा आहार पोषणयुक्त मिळावा." असंही त्या यावेळी म्हणाल्या. अहवालाच्या आधारे संबंधित अधिकाऱ्यांची त्यांनी बैठक घेतली. त्याआधारे महत्त्वाच्या सूचना संबंधित विभागाचे सचिव (FDA,शालेय, ग्रामविकास) यांना केलेल्या आहेत.

१. प्राथमिक शाळेतील मुलांना न्यूट्रिशन बार , शालेय पोषण आहार पुरवले जातात त्या आहाराचा दर्जा तपासून जिल्हा परिषद स्तरावर सुमार दर्जाचे पुरवठा करण्यात आलेले खाद्य नाकारण्यात यावे.

२. पुरवण्यात येणारे खाद्यपदार्थ योग्य आहे की नाही याची तपासणी करण्याची एसओपी बनवण्यात यावी. सदरचे खाद्य तपासताना त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात यावे. तसे अधिकार स्थानिक यंत्रणांना देण्यात यावे.

३. पालघर जिल्ह्यातील चिंचणी व खानिवली येथील तक्रारीनुसार अन्न व औषध प्रशासनाने सॅम्पल घेतले आहेत. त्यांचे अहवाल अप्राप्त आहेत. खराब खाद्यपदार्थ पुरवणाऱ्या पुरवठादारांवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी.

४. पुरवण्यात येणारे खाद्यपदार्थ यांची साठवणूक व्यवस्था उत्तम असावी याची दक्षता शालेय स्तरावर घेण्यात यावी. याची जबाबदारी तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना देण्यात यावी.

५. पुरवठा दराच्या निविदांमधील अटी शर्तीनुसार दर्जेदार खाद्य साहित्य असेल तरच स्वीकारण्याच्या व प्रत्येक टप्प्यावर गुण नियंत्रण राहील याची दक्षता घ्यावी.

राज्यातील सर्वच ठिकाणी दर्जेदार पोषण आहार खाद्य मिळेल याची दक्षता घ्यावी यासंदर्भात लवकरच विधान भवनामध्ये विशेष बैठक आयोजित करण्यात येईल.

### ▶▶| दिल्ली सीमेवरुन आंदोलनकारी...

त्यानंतर त्यांची रवानगी लुक्सर जेलमध्ये करण्यात आली आहे. या दरम्यान पोलिस आणि शेतकऱ्यांत मोठी चकमक उडाली. त्यांच्या वाहनांना देखील हटविण्यात आले. भारतीय किसान परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखबीर खलीफा, भारतीय किसान यूनियनचे ( पश्चिमी उत्तर प्रदेश ) प्रदेश अध्यक्ष पवन खटाना, शेतकरी नेते सुनील फौजी, उदल यादव, सुनील प्रधान, रूपेश वर्मा आणि अमन भाटी सह अनेक शेतकरी नेत्यांना अटक करण्यात आली आहे.दरम्यान, शेतकऱ्यांना अटक केल्याच्या निषेधार्त भारतीय किसान युनियनने ( BKU ) मुझफ्फर नगरात आज सायंकाळी चार वाजता एक पंचायत बोलावली आहे. त्यात राष्ट्रीय अध्यक्ष नरेश टिकैत देखील सामील होणार आहेत. भारतीय न्याय संहितेच्या ( बीएनएस ) कलम १६३ उल्लंघन केल्याने शेतकऱ्यांना अटक करण्यात आली होती. त्यांना बसमध्ये भरुन जिल्हा तुरुंगात पाठविण्यात आले आहे.शहरात कलम १६३ लागू झाल्याने त्याच्या उल्लंघनामुळे शेतकऱ्यांना अटक झाल्याने पोलिसांचे म्हणणे आहे. पोलिसांनी दिल्लीच्या दिशेने निघालेल्या शेतकऱ्यांना सोमवारी गौतमबुद्धनगरच्या सीमेवरच रोखले होते. महामाया उड्डाणपुलामार्गे दिल्ली जाणाऱ्या शेतकऱ्यांना नोएडा पोलिसांना दलित प्रेरणा स्थळाच्या पुढे येऊ दिले नाही. पोलिसांनी रोखल्याने नाराज झालेले शेतकरी रस्त्याच्या मधोमध धरण्यावर बसले. त्यानंतर सायंकाळी पोलिस आणि प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना शासनाशी संवाद साधण्याचा आश्वासन दिल्याने त्यानंतर दिल्ली-नोएडा लिंक रोड मोकळा होऊ शकला.परंतू शेतकरी दलित प्रेरणा स्थळावर ठाण मांडून बसले होते. रात्रीपर्यंत या शेतकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली.शेतकऱ्यांनी तेथे जेवणाची व्यवस्था केली. थंडी पासून वाचण्यासाठी ब्लॅंकेट,रजई असा जामानिमा मागविला होता.रात्री शेतकऱ्यांनी गाणी गाऊन आणि भाषणे करुन एकमेकांचा उत्साह वाढवला. सरकारानी विविध प्रकल्पांसाठी संपादन केलेल्या जमीनीला योग्य मोबदल्याची मागणी करीत अनेक ठिकाणांवरुन आलेल्या शेतकऱ्यांनी काल सोमवारी दिल्लीकडे आगेकुच केली होती, परंतू त्यांना नोएडा-दिल्ली सीमेच्या पुढे जाऊ दिले नाही.पोलिसांनी त्यांना तेथेच रोखले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# माझी वसुंधरा अभियानची अंमलबजावणी कोकण विभागात अधिक प्रभावीपणे करावी - कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख

**ठाणे (रोहित जैसवाल) -** पर्यावरणातील बदल लक्षात घेता माझी वसुंधरा अभियान ५.० हा कार्यक्रम कोकण विभागात वेगाने राबवावा, प्रत्येक यंत्रणेने या अभियानात सक्रिय व्हावे, असे प्रतिपादन कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी केले.

माझी वसुंधरा अभियान ५.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी प्रशासकीय यंत्रणांना मार्गदर्शन करण्यासाठी विभागीय आयुक्त डॉ. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच विभागीयस्तरिय ऑनलाईन दूरदृश्यप्रणालीद्वारे आढावा बैठक झाली. त्या वेळी ते बोलत होते. या आढावा बैठकीत संचालक (माझी वसुंधरा अभियान) सुधाकर बोबडे, उपायुक्त (नगरपरिषद प्रशासन) गणेश शेटे, उपायुक्त (विकास) डॉ. प्रदीप घोरपडे, सहायक आयुक्त (नगरपरिषद प्रशासन) सागर घोलप, तसेच कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा सह आयुक्त (नगरपरिषद प्रशासन), नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, पंचायत समितीचे गट विकास अधिकारी या वेळी उपस्थित होते.

यावेळी विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख म्हणाले की, हा शासनाचा महत्वपूर्ण कार्यक्रम आहे. वातावरणात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आपल्याला प्रयत्न करणे आवश्यक आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी माझी वसुंधरा अभियानामध्ये भूमी, वायू, जल, अग्नी, आकाश



या पंचतत्वावर काम अधिक व्यापक होण्याकरिता मार्गदर्शक सूचनांचे पालन करून कोकण विभागात हे अभियान यशस्वी करावे.

या आढावा बैठकीत माझी वसुंधरा अभियान ५.० चे भूमी, जल, वायू, अग्नी, आकाश तत्वावर आधारित टूलकीटचे सविस्तरपणे प्रेझेंटेशन माझी वसुंधरा अभियानाचे संचालक सुधाकर बोबडे व त्यांच्या पथकाने केले.

भूमी घटकामध्ये वृक्ष लागवड, रोपवाटिका निर्मिती, बांबू-खस-शेवगा लागवड, बीज संकलन, घनकचरा व्यवस्थापन, ओला-सुका कचरा प्रक्रिया, सिंगल युज प्लास्टिक बंदी तसेच वायू घटकामध्ये वायू गुणवत्ता परीक्षण, फटक्यावर बंदी, ईलेक्ट्रिकल वाहन धोरण, वातावरण बदल जनजागृती आणि जलघटकामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प बसविणे, भूजल पुनर्भरण, सांडपाणी प्रक्रिया, पाणथळ जागांचे संवर्धन यांचा समावेश असून अग्नी घटकामध्ये निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जनाबाबत प्रसार व प्रचार, हरित पथदिवे, हरित इमारती, कूल रूफिंग तर, आकाश घटकामध्ये ई शपथ, अभियानामध्ये स्पर्धा व जनजागृती, पर्यावरण दूत, तरुणांचा सहभाग, माझी वसुंधरा तत्वे दर्शविणारे प्रचार व प्रसिद्धी, बचतगट सहभाग, शालेय विद्यार्थ्यांचा सहभाग करून घेणे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

माझी वसुंधरा अभियान ५.० मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत अधिक प्रभावीपणे कामे करून राज्यस्तरीय मानांकन प्राप्त करण्यासाठी शहरांच्या मुख्याधिकारी यांनी विशेष प्रयत्न करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त डॉ. देशमुख यांच्या मार्फत उपस्थितांना देण्यात आल्या.

# झिकाशी लढा देण्यास ठाणे तत्पर

## रुग्णांसाठी ३० बेडचा स्वतंत्र कक्ष सज्ज

**ठाणे (विवेक गुंजाळ) :** राज्यातील काही शहरांत झिका व्हायरसने शिरकाव केला आहे. मुंबईसारख्या शहरांतही या व्हायरसचे लागण झालेले रुग्ण आढळून आले आहेत. अशावेळी ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालय या व्हायरसचा सामना करण्यासाठी सज्ज झाले आहे. अशा रुग्णांकरिता स्वतंत्र कक्ष निर्माण केला आहे. या कक्षामध्ये आधुनिक सुविधेसह ३० खाटा रिकाम्या ठेवल्या आहेत. तसेच योग्य प्रमाणात औषधसाठा आणि आपत्कालीन पॅरामेडिकल टीमला सतर्क राहण्याचे निर्देश दिले आहेत. ठाणे जिल्ह्यात थंडीची लाट येत आहे. त्यातच सर्दी, खोकला, तापाच्या




रुग्णांमध्ये वाढ झाल्याचे दिसत आहे. तसेच मलेरियासारख्या आजाराची लागण झालेले रुग्णदेखील उपचारासाठी येत आहेत. त्याचप्रमाणे पुणे, मुंबईसह राज्यातील काही भागांमध्ये झिका व्हायरस पसरवणारे डास आढळून आल्याने आरोग्य यंत्रणा कामाला लागली आहे. राज्य आरोग्य यंत्रणेनेदेखील रुग्णालयांना सज्ज राहण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालय सतर्क झाले आहे. अशा रुग्णांच्या उपचारासाठी ३० खाटांचा अद्ययावत कक्ष तयार ठेवला आहे. गरोदर महिलांनी योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. मच्छरदाणीसारखी साधने वापरणे आवश्यक आहे. हा डास गरोदर महिलेला चावल्यास त्यातून झालेल्या झिका व्हायरसची बाळाला लागण होण्याची दाट शक्यता असते. झिका व्हायरसची माहिती प्रसार माध्यमांवर सांगण्यात येत आहे; मात्र ठाणे जिल्ह्यात या प्रकारचा रुग्ण अद्याप आढळून आलेला नाही; तरीही खबरदारी म्हणून जिल्हा रुग्णालयात पुरेशी वैद्यकीय अधिकाऱ्यांची टीम सज्ज ठेवली आहे.



# क्रिप्टो चलनाच्या नावाने २६ लाख रुपयांची फसवणूक

**ठाणे (विशाल कारंडे) :** आभासी (क्रिप्टो) चलनाच्या नावाने ठाण्यातील चार जणांची २६ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी २० जणांविरोधात ठाणेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

फसवणूक झालेले गुंतवणूकदार ठाण्यात वास्तव्यास आहेत. काही महिन्यांपूर्वी त्यांची ओळख जालना येथे राहणाऱ्या व्यक्तींशी झाली होती. त्यांच्याकडे आभासी चलन असून या चलनामध्ये गुंतवणूक केल्यास दरमहा १२ ते १५ टक्के परतावा मिळेल असे अमीष दाखविण्यात आले. त्यामुळे गुंतवणूकदारांनी टप्प्या-टप्प्याने विविध बँग खात्यात २६ लाख दोन हजार ५५७ रुपये गुंतविले होते. त्यांना गुंतवणूकीस प्रवृत्त करणारे २० जण होते.

# महावितरणच्या टिटवाळा उपविभागातील ८७ वीज चोरांविरुद्ध गुन्हे दाखल

## २४ लाखांची वीजचोरी उघड



**कल्याण (गणेश बागडे) :** - महावितरणच्या टिटवाळा उपविभागात वीज चोरांविरुद्ध सातत्याने कारवाई सुरू आहे. गत नोव्हेंबर महिन्यात केलेल्या तपासणीत ८७ जणांकडे २४ लाख २० हजार रुपयांची वीजचोरी आढळली. या सर्व ८७ जणांविरूद्ध वीज कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार मुरबाड पोलिस ठाण्यात वीजचोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. चंद्रमणि मिश्रा आणि कल्याण मंडल दोनचे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे, कल्याण ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता विनय काळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. मांडा-टिटवाळा शाखा कार्यालयांतर्गत टिटवाळा मंदिर परिसर, बल्याणी, बनेली, मांडा पश्चिम भागातील ४० तर गोवेली शाखेंतर्गत म्हारळ व वरप भागात ३३ जणांकडे तसेच खडवली परिसरात १४ जणांकडे वीजचोऱ्या आढळून आल्या. चोरीच्या विजेच्या देयक व दंडाच्या रकमेचा भरणा टाळणाऱ्या या ८७ जणांविरुद्ध दिलेल्या फिर्यादीनुसार मुरबाड पोलिसांनी गुन्ह्याची नोंद केली आहे. टिटवाळा उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता गणेश पवार, सहायक अभियंते धनंजय पाटील, निलेश शिर्के, तुकाराम घोडविंदे, कनिष्ठ अभियंते सचिन पवार, अलंकार म्हात्रे आणि त्यांच्या टिमने ही कामगिरी केली.

# ई- गव्हर्नन्स आणि संगणकीकरण निधीचे योग्य नियोजन करा



**ठाणे (राकेश गायकवाड) :** गृहनिर्माण आणि नगर विकास खात्याच्या स्थायी समितीची बैठक आज संसदभवन, दिल्ली येथे संपन्न झाली. यावेळी ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के यांनी केंद्रीय निधीचे योग्य नियोजन करणे, विकासकामांवर देखरेख ठेवणे, झालेल्या कामांचे ऑडिट करणे, अशा महत्वपूर्ण केल्या.गृहनिर्माण आणि नगर विकास खात्याच्या कमिटीत देशातील शहर विकास, नियोजन, गृहनिर्माण या विषयांवर निर्णय घेतले जातात. केंद्र सरकार देत असलेल्या निधीचे नियोजन आणि त्याचा वापर योग्य पध्दतीने होतो की नाही? यावर चर्चा करुन निर्णय घेतले जातात. काही ठिकाणी फक्त दिखाव्या करिता सल्लागार कंपनी तर्फे सादरीकरण केले जाते आणि केंद्राकडून निधी उपलब्ध करुन घेतला जातो. प्रत्यक्षात बऱ्याच योजना या सादरीकरणासाठी असतात. असे उपक्रम पुढे सुरु राहत नाहीत. अल्पावधीत ते बंद केले जातात. याकरिता सल्लागार कंपन्यांच्या रिपोर्टवर अवलंबून न राहता शासनाने स्वत: देखरेख ठेवणे गरजेचे आहे. तसेच केंद्र सरकारने झालेल्या विकासकामांचे ऑडिट करणे गरजेचे आहे, असे मत खासदार नरेश म्हस्के यांनी व्यक्त केले. रस्ते, विद्युत, पाणी पुरवठा या सारखी कामे प्रत्यक्षात दिसतात. परंतु संगणीकरण तसेच ई गव्हर्नन्सची कामे प्रत्यक्षात दिसत नाही. यामुळे या ठिकाणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असतो. याकरीता केंद्र सरकारने कडक पावले उचलण्याची गरज आहे. याची चौकशी करावी, अशी मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी बैठकीत केली.

# ठाणे पालिकेने दोन वर्षांपासून दिव्यांगांचे २९ कोटी रखडवले

## दिव्यांगांची पालिकेवर धडक



**ठाणे (सचिन कदम) -** लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ, वयोश्री अशा विविध योजनांवर सरकार शेकडो कोटी रुपये खर्च करत आहे. त्याचवेळी ठाण्यातील दिव्यांग बांधवांना दोन वर्षांपासून अनुदानाची फुटकी कवडी दिली नसल्याचे समोर आले आहे.

शिंदे गटाचे अप्रत्यक्षरीत्या वर्चस्व असलेल्या ठाणे पालिकेने दिव्यांगांचे २९ कोटी रुपयांचे अनुदान लटकवले आहे. याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही शिंदे गट तसेच पालिका प्रशासन कानाडोळा करत असल्याने आज दिव्यांगांनी पालिकेवर धडक देत प्रवेशद्वारावर ठिय्या दिला. आमचे पैसे कधी देणार, आता आश्वासने देणे बंद करा, आम्ही सरकारचे लाडके भाऊ नाही का, असा सवाल यावेळी आंदोलकांनी केला. दरम्यान प्रशासनाने नेहमीचीच टेप वाजवत लवकरच अनुदान देऊ असे सांगत वेळ मारून नेली. ठाणे शहरात जवळपास १२ हजारांहून अधिक दिव्यांग बांधव आहेत. प्रत्येक दिव्यांग बांधवांना दरवर्षी २४ हजार रुपये अनुदान दिले जाते. दिव्यांग बांधवांसाठी दिले जाणारे अनुदान २०२३ पासून रखडले असल्याने त्यांच्या जीवनात मोठी अडचण निर्माण झाली असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला आहे.

गेल्या दोन वर्षांचे मिळणारे अनुदान सरसकट तत्काळ उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी आज दिव्यांग बांधवांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे. दिव्यांगांची आर्थिक परिस्थिती बिकट असून त्यांनी आपल्या कुटुंबासमवेत दोन वर्षे दिवाळी गोड करू शकले नसल्याने दिव्यांगांनी संताप व्यक्त केला आहे. यासंदर्भात दिव्यांग बांधवांनी ठाणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रशांत रोडे यांची भेट घेतली असता त्यांनी लवकरात लवकर मागील दोन वर्षांचे निधी देण्यात येईल असे आश्वासन दिले आहे.

# केडीएमसी आयुक्तांनी केली कल्याण मधील महापालिकेच्या मराठी शाळांची पाहणी



**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त इंदु राणी जाखड यांनी सोमवारी महानगरपालिकेच्या मनपा शाळा क्रमांक ३३ धाकटे शहाड, शाळा क्रमांक ६३ मिलिंद नगर, शाळा क्रमांक ६८ बारावे या तीन शाळांना भेटी दिल्या. या भेटी दरम्यान शाळा इमारत, वर्ग खोल्या, दिल्या जाणाऱ्या भौतिक सुविधा तसेच शाळा परिसर यांची त्यांनी पाहणी केली आणि शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी वर्ग सुरू असताना संवाद साधला. शाळेसंदर्भातील बाबी म्हणजे विद्यार्थी पटसंख्या वाढविणे, शैक्षणिक सुविधा पुरविणे, शाळा इमारत सुसज्ज करणे याबाबत संबंधित अधिकारी व अभियंता यांना त्यांनी सूचना दिल्या. त्याचप्रमाणे विनापरवानगी रजेवर जाणाऱ्या शिक्षकांची विनावेतन रजा मंजूर करण्याबाबत व वेळेत शाळेत हजर न राहणाऱ्या शिक्षकांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. तसेच वेळप्रसंगी निलंबित करण्याची कारवाई करण्याच्या सूचनाही आयुक्त इंदु राणी जाखड यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी शिक्षण विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे तसेच इतर अधिकारी वर्ग उपस्थित होता.

# टीएमटी विभागाने विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला

**ठाणे (सम्यक कासारे) :** ठाणे महापालिका परिवहन (टीएमटी) विभागाने विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला आहे. गेल्या अकरा महिन्यांत ६ हजार ९७५ प्रवाशांवर कारवाई करून त्यांच्याकडून १२ लाख १४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. ठाणे परिवहन विभागाकडून विना तिकीट प्रवास करणाऱ्यांवर वारंवार कारवाई केली जात असल्याची माहिती ठाणे परिवहन विभागाकडून देण्यात आली. ठाणे शहरातील विविध मार्गांसह मुलुंड, बोरिवली, मिरा-भाईंदर अशा काही शहरांमध्ये ठाणे परिवहन



विभागाच्या टीएमटी बस गाड्या धावतात. या बसगाड्यांमधून दिवसाला हजारोच्या संख्येने प्रवासी प्रवास करतात. प्रत्येक मार्गाच्या अंतरानुसार तिकीट दर ठरलेले असतात. बसमधील वाहक प्रवाशांकडून भाडेदर आकारुन तिकीट देतात. परंतू, अनेकदा बसमध्ये गर्दी असल्यामुळे काही प्रवासी लबाडीने वाहकाची नजर चूकवून तिकीट काढत नाहीत. गेल्या वर्षभरात विना तिकीट प्रवास करणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढल्याचे दिसत आहे. अशा प्रवाशांवर लक्ष ठेवण्यासाठी शहरातील विविध बस थांब्यावर तिकीट तपासणी करणारे अधिकारी उभे असलेले दिसतात. तर, अनेकदा तिकीट तपासणी करणारे अधिकारी बस मध्ये देखील चढतात. यांच्याकडून प्रवाशांच्या तिकीटांची तपासणी केली जाते.

> ■ प्रवाशांनी विना तिकीट प्रवास करु नये असे वारंवार आवाहन करण्यात येते तरी देखील काही प्रवासी विना तिकीट प्रवास करतात. असे प्रवासी आढळून आल्यास त्यांच्या ताटकाळ दंडात्मक कारवाई केली जाते.
>
> **- भालचंद्र बेहेरे, वाहतूक व्यवस्थापक, ठाणे परिवहन विभाग**

या तपासणी दरम्यान एखादा प्रवासी विना तिकीट आढळून आल्यास त्यावर ताटकाळ दंडात्मक कारवाई केली जाते. त्या प्रवाशाकडून प्रवासी भाडेदरासह २०० रुपये दंड आकारण्यात येतो. गेल्या अकरा महिन्यात विना तिकीट प्रवास करणाऱ्या ६ हजार ९७५ प्रवाशांवर ठाणे परिवहन विभागामार्फत कारवाई करण्यात आली असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. या प्रवाशांकडून ६८ हजार ५८४ रुपये भाडेदर वसूली करण्यात आली आहे. तर, १२ लाख १४ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला असल्याचे ठाणे परिवहन विभागाकडून आलेल्या अहवालातून समोर आले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांवर बिग बजेट पॅन इंडिया चित्रपट येतोय ! साऊथचा सुपरस्टार मुख्य भूमिकेत

कांतारा चित्रपटामुळे संपूर्ण देशातील घराघरात पोहोचलेला कानडी अभिनेता ऋषभ शेट्टी आता आणखी एका बिग बजेट चित्रपटाच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर झळकणार आहे. संपूर्ण भारताचं आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरीत्रावर आधारीत पॅन इंडिया चित्रपट साकारला जात असून ऋषभ त्यामध्ये शिवरायांची भूमिका साकारत आहेत. ऋषभने स्वतःच याबाबतची माहिती दिली आहे. त्याने त्याचा या चित्रपटातील फर्स्ट लूक देखील सादर केला आहे.

या चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरसह चित्रपटाच्या प्रदर्शनाची तारीख देखील जाहीर करण्यात आली आहे. २१ जानेवारी २०२७ रोजी हा चित्रपट प्रदर्शित करण्याची योजना निर्मात्यांनी आखली आहे. हा चित्रपट हिंदीसह विविध भाषांमध्ये प्रदर्शित केला जाणार आहे. संदीप सिंह हे या चित्रपटाचं दिग्दर्शन करणार आहेत.

चित्रपटाचं पहिलं पोस्टर सादर करताना ऋषभने त्याच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे की आपला सन्मान आणि विशेषाधिकार, भारतातील महान योद्धा व महान राजाची गाथा



प्रस्तुत करत आहोत. 'दी प्राइड ऑफ भारत – छत्रपती शिवाजी महाराज’. हा केवळ एक चित्रपट नाही. हा एका योद्ध्याच्या सन्मानार्थ केलेला युद्धघोष आहे. ज्याने अनेक वादळं पायदळी तुडवतं हिंदवी स्वराज्य साकारलं आणि शक्तीशाली मुघल साम्राज्याला आव्हान दिलं. ज्या राजाने आपल्याला मोठा वारसा दिला ही त्याची गोष्ट... २७ जानेवारी २०२७ रोजी जगभरात प्रदर्शित केली जाईल.

दिग्गज गायिका आशा भोसले यांची नात जनाई भोसले लवकरच मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. ती या ऐतिहासिक चित्रपटातून सिनेसृष्टीत पदार्पण करणार आहे. जनाई ही या चित्रपटात ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पत्नी सईबाई भोसले यांची भूमिका साकारणार आहे. जनाई ही या चित्रपटात ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पत्नी सईबाई भोसले यांची भूमिका साकारणार आहे. जनाई ही आशा भोसले यांचे पूत्र आनंद भोसले यांची मुलगी आहे. जनाई सोशल मीडियावर खूप सक्रिय आहे. तिचे इन्स्टाग्रामवर लाखो फॉलोअर्स आहेत. उत्तम गायिका असलेली जनाई आता अभिनय करताना रुपेरी पडद्यावर दिसणार आहे.

## सहजीवनाची ८ वर्षे! मृण्मयी देशपांडेचं आहे अरेंज मॅरेज; नवऱ्यासाठी लिहिली खास पोस्ट

मराठी कलाविश्वात आपला अभिनय व नृत्याचा एक वेगळा ठसा उमटवणारी लोकप्रिय अभिनेत्री म्हणून मृण्मयी देशपांडेला ओळखलं जातं. तिचं सूत्रसंचालन सुद्धा प्रेक्षकांना तेवढचं भावतं. रुपेरी पडद्यावर स्वत:ची एक वेगळी छाप उमटल्यावर मृण्मयी वैयक्तिक आयुष्यात ३ डिसेंबर २०१६ मध्ये लग्नबंधनात अडकली. तिच्या लग्नाला आज ८ वर्षं पर्ण झाली आहेत. यानिमित्ताने अभिनेत्रीने आपल्या नवऱ्यासाठी रोमँटिक पोस्ट लिहित भावना व्यक्त केल्या आहेत.





मृण्मयीने २०१६ मध्ये स्वप्नील रावशी लग्न केलं. या दोघांचं लग्न अरेंज मॅरेज पद्धतीत जमलं आहे. घरच्यांनी स्थळ पाहिल्यावर मृण्मयी आणि स्वप्नील एकमेकांना भेटले. या दोघांची एकमेकांशी ओळख झाल्यावर यांचे सूर जुळले, भेटीगाठी वाढल्या आणि कालांतराने मृण्मयी-स्वप्नीलने लग्नबंधनात अडकण्याचा निर्णय घेतला. आज अभिनेत्री तिच्या लग्नाचा आठवा वाढदिवस साजरा करत आहे.

### मृण्मयी देशपांडेची नवऱ्यासाठी खास पोस्ट

मृण्मयी नवऱ्याला शुभेच्छा देताना लिहिते, "८ वर्ष... स्वप्नील, गेली ९ वर्षे आपण एकमेकांना ओळखतो... त्यात सहजीवनाची ही ८ वर्षे. या संपूर्ण काळात आपल्या नात्यात कधीच कंटाळवाणा क्षण आला नाही. ही सगळी वर्षे अत्यंत सुंदर होती. माझं तुझ्यावर खूप प्रेम आणि त्यापेक्षाही मला तुझा प्रचंड अभिमान आहे. आपण निवडलेला मार्ग निश्चितच सोपा नाहीये. पण, हे क्षण मी तुझ्याशिवाय अन्य कोणाबरोबरही अनुभवू शकत नाही. आयुष्यात असेच सुंदर क्षण एकत्र घालवूयात... आय लव्ह यू." मृण्मयीच्या या पोस्टवर चाहत्यांसह मराठी कलाविश्वातील कलाकारांनी कमेंट्स करत या जोडप्याला लग्नाच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

दरम्यान, मृण्मयी सध्या मुंबई सोडून महाबळेश्वरमध्ये तिच्या नवऱ्याबरोबर राहते. या जोडप्याने निसर्गाच्या सानिध्यात महाबळेश्वरमध्ये सुंदर असं घर बांधलं आहे. याच ठिकाणी दोघांनी 'नील अँड मोमो' नावाचा व्यवसाय सुरू केला आहे. दोघेही शेतात एकत्र काम करून नैसर्गिक उत्पादनांच्या निर्मितीवर भर देत आहेत. २०२० पासून मृण्मयी मुंबई सोडून महाबळेश्वरला स्थायिक झाली. त्यांच्या शेतातील सुंदर फोटो व व्हिडीओ अभिनेत्री सोशल मीडियावर शेअर करत असते.

## तुमच्या बायोपिकमध्ये कोणत्या अभिनेत्रीला पाहायला आवडेल?

अभिनेत्री वर्षा उसगांवकर या त्यांच्या चित्रपट, मालिकेतील भूमिकेमुळे सतत चर्चेत असतात. आता मात्र एका मुलाखतीमध्ये त्यांनी केलेल्या वक्तव्याची चर्चा होताना पाहायला मिळत आहे. जर त्यांच्यावर बायोपिक आला तर त्यामध्ये कोणत्या अभिनेत्रीला पाहायला आवडेल, याबद्दल त्यांनी वक्तव्य केले आहे. लोकशाही मराठी फ्रेंडली या यूट्यूब चॅनेलला वर्षा उसगांवकरांनी नुकतीच मुलाखत दिली. या मुलाखतीमध्ये त्यांना विचारण्यात आले की, समजा तुमच्यावर बायोपिक निघाला तर तुमच्या बायोपिकमध्ये कोणत्या अभिनेत्रीला पाहायला आवडेल? यावर उत्तर देताना वर्षा उसगांवकरांनी म्हटले, "मला वाटतं एक काळ असा होता की अर्चना जोगळेकर आणि माझ्यात साध्यर्म्य आहे, असे लोक म्हणायचे. मला पुरस्कार मिळाला की लोक तिचे अभिनंदन करायचे. तिला मिळाला तर माझं अभिनंदन करायचे. तर अर्चना जोगळेकरसारखी दिसणारी तरूण अभिनेत्री कोण असती तर मी म्हटलं असतं तिला माझ्या बायोपिकमध्ये घ्या. पण, तिच्यासारखी दिसणारी मला आता तरी कोणी



वाटत नाही. पटकन कोणी डोळ्यासमोर येत नाही." याच मुलाखतीत वर्षा उसगांवकरांनी 'बिग बॉस मराठी ५'मधील सदस्यांविषयी त्यांचे मत मांडले आहे. अरबाज, निक्की, जान्हवी, अभिजीत, सूरज, पंढरीनाथ कांबळे, अंकिता वालावलकर अशा सर्व सदस्यांबद्दल त्यांचे मत त्यांनी व्यक्त केल्याचे पाहायला मिळाले. याबरोबरच वर्षा उसगांवकरांनी मिथुन चक्रवर्ती, ऋषी कपूर यांच्याबरोबर काम करण्याचा अनुभवदेखील सांगितला आहे. ऋषी कपूर यांच्याबरोबर त्यांनी 'हनिमून' चित्रपटात काम केले होते. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान ज्यावेळी ऋषी कपूर सेटवर यायचे तेव्हा जास्त बोलायचे नाहीत, त्यामुळे ते खडूस आहेत असे मला वाटत होते, असे वर्षा उसगांवकरांनी म्हटले.

## एक्स बॉयफ्रेंड व त्याच्या मैत्रिणीला जिवंत जाळलं, बॉलीवूड अभिनेत्रीच्या बहिणीला अटक



'रॉकस्टार' फेम बॉलीवूड अभिनेत्री नर्गिस फाखरी हिची बहीण आलिया फाखरी हिला अमेरिकेत अटक करण्यात आली आहे. आलियावर एक्स बॉयफ्रेंड एडवर्ड जेकब्स आणि त्याची मैत्रिण अॅनास्तेसिया स्टार एटीन यांच्या खूनाचा आरोप आहे. आलियाने न्यूयॉर्कमधील क्वीन्स येथे एका गॅरेजला आग लावली, त्यात त्या दोघांचा मृत्यू झाला. आलियाने ईर्ष्येच्या भावनेतून हे धक्कादायक कृत्य केले.

आलियाने दोन मजली गॅरेजला आग लावली, त्यात पीडितांचा जीव गुदमरल्याने आणि भाजल्यामुळे मृत्यू झाला, असा आरोप तपास आलियावर आहे. तिला जामीन नाकारण्यात आला आहे. डेली न्यूजच्या वृत्तानुसार, आलियाने न्यूयॉर्कमधील क्वीन्स येथे एका दोन मजली गॅरेजला आग लावली. या आगीत एडवर्ड जेकब्स आणि अॅनास्तेसिया जिवंत जळाले. आलियाला अटक करण्यात आली असून तिला न्यायालयाने जामीन नाकारला आहे. "तिने जाणीवपूर्वक त्या दोघांना आगीत अडकवलं. धुरात जीव गुदमरल्याने आणि भाजल्याने दोन्ही पीडितांचा दुर्दैवी मृत्यू झाला," असं डिस्ट्रिक्ट अॅटर्नी मेलिंडा कॅट्झ यांनी एका निवेदनात म्हटलं आहे.

नर्गिस फाखरीने बहिणीवर लागलेल्या या आरोपांप्रकरणी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. पण तिच्या आईने आलियाचा बचाव केला असून ती असं करू शकत नसल्याचं म्हटलं आहे. "मला वाटत नाही की ती कोणाचा खून करेल.

## विक्रांत मॅसीच्या निवृत्तीच्या घोषणेवर त्याच्या सहकलाकाराने व्यक्त केली शंका



विक्रांत मॅसीने आज मंगळवार (०३ डिसेंबर २०२४) अभिनयातून अचानक निवृत्ती जाहीर करून सर्वांना धक्का दिला. मात्र, त्याच्या आगामी 'झिरो से रिस्टार्ट' या चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या अगोदर ही घोषणा केल्याने अनेक तर्कवितर्कांना उधाण आले आहे. आता त्याचा मधील सहकलाकार हर्षवर्धन राणेने देखील यावर प्रतिक्रिया देताना ही केवळ 'पीआर स्ट्रॅटेजी' असावी, असा अंदाज व्यक्त केला आहे. 'बॉलीवूड बबल'ला दिलेल्या मुलाखतीत हर्षवर्धन राणेने विक्रांत मॅसीच्या निर्णयावर भाष्य करत म्हटले, "विक्रांत हा शांत आणि स्पष्ट विचारसरणी असलेला माणूस आहे. मी त्याच्या कामाच आणि काम करण्याच्या पद्धतीच खूप कौतुक करतो. 'हसीन दिलरुबा'च्या शूटिंगदरम्यान त्याचा अभिनय पाहून खूप काही शिकायला मिळाले. मला आशा आहे की, तो पुन्हा चित्रपटांत काम करेन. आमिर खान सरांनी देखील एकदा त्याच्यासारखीच घोषणा केली होती. पण ते पुन्हा चित्रपटसृष्टीत आले मला आशा आहे की विक्रांत सुद्धा पुन्हा सिनेमात काम करताना दिसेल.

हे कलाकार आपल्या देशासाठी खूप महत्त्वाचे आहेत, आणि त्यांच्या उपस्थितीने भारतीय सिनेमा समृद्ध होतो. मी अशी प्रार्थना करतो की विक्रांतने केलेली निवृत्तीची घोषणा हा फक्त एखाद्या सिनेमासाठी त्याच्यावर निर्मात्याने लादलेला पीआर स्टंट असावा." आज सकाळी विक्रांत मॅसीने आपल्या 'इन्स्टाग्राम' अकाउंटवरून अभिनयातून निवृत्ती जाहीर केली. त्याने पोस्टमध्ये लिहिले, "माझ्यासाठी मागची काही वर्षे खूपच विलक्षण होती. तुम्ही दिलेल्या पाठिंब्यासाठी मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे. पण, जसजसा मी आयुष्यात पुढे जात आहे, तसतसं मला जाणवतंय की, आता एक पती, वडील आणि अभिनेता म्हणूनही स्वतःमध्ये सुधारणा करण्याची आणि घरी परतण्याची वेळ आली आहे. येत्या २०२५ मध्ये आपण एकदा एकमेकांना शेवटचं भेटू. शेवटचे दोन चित्रपट आणि अनेक वर्षांच्या आठवणी बरोबर घेऊन सर्वांचे पुन्हा एकदा आभार. मी तुमचा कायम ऋणी राहीन." विक्रांत मॅसी लवकरच विधू विनोद चोप्रा यांच्या 'झिरो से रिस्टार्ट' या चित्रपटात दिसणार आहे. याशिवाय, तो अमित जोशी यांच्या 'यार जिगरी' या चित्रपटात सनी सिंगबरोबर, तर संतोष सिंग यांच्या 'आंखों की गुस्ताखियां' या चित्रपटात शनाया कपूरबरोबर काम करत आहे. तर हर्षवर्धन राणे बाबतीत सांगाय झालं, तर तो 'सनम तेरी कसम २' मध्ये झळकणार आहे.

## "पवनने ज्याप्रकारे माझा हात घट्ट...", रेश्मा शिंदेचा सासरी थाटात गृहप्रवेश!

'रंग माझा वेगळा', 'घरोघरी मातीच्या चुली', 'नांदा सौख्यभरे', 'चाहुल' या गाजलेल्या मालिकांमधून अभिनेत्री रेश्मा शिंदे घराघरांत लोकप्रिय झाली. छोट्या पडद्यावर तिचा एक वेगळा चाहतावर्ग निर्माण झाला आहे. गेल्या काही दिवसांपासून रेश्माच्या लग्नसोहळयाची सर्वत्र चर्चा चालू आहे. केळवण, मेहंदी, हळद हे लग्नाआधीचे विधी पार पडल्यावर रेश्मा २९ नोव्हेंबरला लग्नबंधनात अडकली.



रेश्माचा लग्नसोहळा आधी मराठमोळ्या पद्धतीने आणि त्यानंतर दाक्षिणात्य पद्धतीने पार पडल्याचं समोर आलेल्या फोटोंमधून स्पष्ट होत आहे. रेश्मा आणि पवन यांच्या लग्नाला कलाविश्वातील असंख्य कलाकारांनी उपस्थिती लावली होती. तिच्या दोन्ही मालिकांच्या टीम यावेळी विवाहसोहळयाला उपस्थित होत्या. रेश्माच्या लग्नातील अनेक फोटो आणि व्हिडीओ सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत. अशातच लग्न पार पडल्यावर रेश्माच्या सासरकडच्या गृहप्रवेशाचा एक सुंदर व्हिडीओ आता समोर आला आहे.

### रेश्मा शिंदेचा सासरी 'असा' पार पडला गृहप्रवेश

रेश्मा शिंदेचा वाढदिवस २ डिसेंबरला साजरा करण्यात आला. या खास दिवशी पवनने बायकोसह देवदर्शन घेतानाचा फोटो शेअर करत तिला शुभेच्छा दिल्या. यानंतर रात्री उशिरा रेश्माने तिच्या गृहप्रवेशाचा सुंदर असा व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. पवनच्या घरी रेश्माचं थाटामाटात स्वागत करण्यात आलं.

नव्या नवरीसाठी फुलांची सजावट, संपूर्ण बंगल्याला रोषणाई याशिवाय दारात सुंदर रांगोळी काढण्यात आली होती. पवनच्या कुटुंबीयांनी अभिनेत्रीचं औक्षण केलं. यानंतर माप ओलांडून रेश्माचा नव्या घरात गृहप्रवेश झाला. यादरम्यान रेश्माचा नवरा पवनने तिचा हात घट्ट पकडून ठेवल्याचं व्हिडीओमध्ये पाहायला मिळत आहे. यामुळेच अभिनेत्रीने या गृहप्रवेशाच्या व्हिडीओला "गृहप्रवेश... पवनने ज्याप्रकारे माझा हात घट्ट पकडला होता" असं कॅप्शन दिलं आहे.

दरम्यान, रेश्माच्या व्हिडीओवर नेटकऱ्यांनी "सुंदर", "सुंदर घर", "खूप छान सासर आहे रेश्मा", "घरातली माणसं सुद्धा तुझ्या सारखीच हसरी आणि गोड" अशा प्रतिक्रिया देत कौतुकाचा वर्षाव केला आहे. याशिवाय मराठी कलाकारांनी सुद्धा या व्हिडीओवर भरभरून कमेंट्स केल्या आहेत.

## राशी भविष्य




**मेष** – अधिक संवेदनशील व्हाल. दिवस आनंदात जाईल. उग्र चर्चा करू नका. आर्थिक मदत मिळेल. कला क्षेत्रात चमकाल.

**वृषभ** – आपल्या नोकरीत फायदेशीर बदल करता येतील. मान-सन्मानाचा योग येईल. रागीट आणि हट्टी स्वभावाला मुरड घाला.

**मिथुन** – आकस्मिक पैसे खर्च होतील. गृहस्थ जीवनात सुख आणि आनंद मिळेल. तणाव कमी करण्याचा प्रयत्न करता येईल.

**कर्क** – कार्यक्षेत्रात आपला प्रभाव टिकून राहील. कलाकारांना प्रतिभा दाखवण्याची संधी मिळेल. बोलण्यातून गैरसमज होऊ शकतो.

**सिंह** – प्रतिष्ठेचा बडेजाव न करता कामे करा. शेजारी मदत करतील. सरकारी कामात यश मिळेल. आपल्या रागावर नियंत्रण ठेवा.

**कन्या** – नकारात्मक विचारांपासून दूर राहा. आर्थिक कार्यात लाभ मिळेल. पाल्यांसाठी पैसे खर्च होऊ शकतात. नवीन परिचय होतील.

**तूळ** – महत्त्वाची वस्तू नीट सांभाळा. नोकरीत कामाचा व्याप वाढेल. कोर्टाच्या कामात यश मिळेल. आनंददायी पर्यटन होईल.

**वृश्चिक** – आत्मविश्वासाने काम केल्याने यश मिळेल. सार्वजनिक जीवनात प्रतिष्ठा लाभेल. सहकाऱ्यांशी मिळते जुळते धोरण ठेवा.

**धनु** – संमिश्र स्वरूपाचे वातावरण राहील. आळस करू नका. सोबत काम करणाऱ्यांचे सहकार्य मिळेल. विचारांना चालना मिळेल.

**मकर** – कुटुंबीय तसेच मित्रांसोबत वेळ घालवाल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. वाहन जपून चालवा. प्रयत्नाने कामे मार्गी लागतील.

**कुंभ** – तब्येत उत्तम राहील. एखादी उत्साह वाढवणारी घटना घडेल. आपल्या बोलण्यावर आणि वर्तनावर संयम ठेवावा लागेल.

**मीन** – नव्या कामाचा शुभारंभ करू शकता. आरोग्यावर पैसे खर्च होतील. मोहाला बळी पडू नका. इतरांशी नम्रपणे बोलावे.

# महापरिनिर्वाण दिनासाठी चैत्यभूमीवरील सुविधांची कोकण विभागीय आयुक्तांकडून पाहणी



मुंबई (विशाल कारंडे) : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरातून लाखो अनुयायी दादरच्या चैत्यभूमीवर येऊन अभिवादन करतात. त्यांच्यासाठी प्रशासनामार्फत विविध सोयीसुविधा चैत्यभूमी आणि परिसरात केल्या जातात. कोकण विभागीय आयुक्त डॉ. राजेश देशमुख यांनी या सुविधांची पाहणी करून आढावा घेतला.

विभागीय आयुक्त श्री. देशमुख म्हणाले की, चैत्यभूमीवर येणाऱ्या अनुयायांसाठी भोजनाची व्यवस्था करण्यात येत असून अनुयायांसाठी वैद्यकीय कक्षही उभारण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराज मैदान (शिवाजी पार्क) आणि परिसरात पुरविण्यात येणाऱ्या नागरी सेवा-सुविधांबाबत सर्व यंत्रणांनी सूक्ष्म नियोजन करीत समन्वय साधून कार्यवाही करावी. तसेच उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधा अनुयायांना मिळतात की नाही याची खात्री करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी कोकण विभागीय अतिरिक्त आयुक्त विवेक गायकवाड, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे सहायक आयुक्त अजितकुमार आंबी, सहायक पोलीस आयुक्त प्रवीण तेजाळे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू भीमराव आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

# राज्यातील शेकडो धरणांचे पाणी नियोजन अधांतरी, सिंचन आरक्षणावरही परिणाम



नाशिक (सचिन कदम) : विधानसभा निवडणूक आचारसंहिता, निकालानंतर सरकार स्थापनेत लागणारा वेळ, या घटनाक्रमात राज्यातील मोठ्या आणि मध्यम प्रकल्पातून सिंचनासाठी कालवा सल्लागार समितीमार्फत केली जाणारी पाण्याची व्यवस्था अडचणीत आली आहे. यासंदर्भात मोठ्या प्रकल्पांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार जलसंपदामंत्री तर, मध्यम प्रकल्पांविषयी पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितींकडे आहेत. समिती अस्तित्वात येण्यास जितका कालापव्यय होईल, तितके राज्यातील ३९८ प्रकल्पातील जलसाठ्याचे नियोजन लांबणीवर पडणार आहे. परिणामी, धरणे तुडुंब असूनही ते पाणी शेतीला देण्यात अडसर येऊ शकतो. मोठ्या आणि मध्यम प्रकल्पनिहाय पाणी आरक्षणासाठी स्वतंत्र समित्या कार्यरत असतात. पावसाळा संपल्यानंतर दरवर्षी शासन मान्यता नसणारी वाढीव मागणी आणि पाण्याचे स्त्रोत नसलेल्या भागासाठी पाणी आरक्षणाचे निर्णय स्थानिक पातळीवर पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील आकस्मित पाणी आरक्षण समितीकडून घेतले जातात. सिंचनासाठी वास्तववादी आढावा घेऊन कालवा सल्लागार समिती पाणी आरक्षित करते. ज्या प्रकल्पाचे लाभक्षेत्र एक लाख हेक्टरपेक्षा अधिक, त्या कालवा सल्लागार समितीचे अध्यक्षपद जलसंपदामंत्री किंवा या खात्याच्या राज्यमंत्र्यांकडे तर, ज्या प्रकल्पांचे लाभक्षेत्र एक लाख हेकटरपेक्षा कमी, त्या समितीचे अध्यक्षपद संबंधित प्रकल्प ज्या जिल्ह्यात आहे, तेथील पालकमंत्र्यांकडे असते. एरवी पावसाळा संपताच या अनुषंगाने बैठकांचे सत्र सुरू होते. त्यासाठी १५ ऑक्टोबर रोजीच्या धरणांतील जलसाठ्यांचा आधार घेतला जातो. राज्यात याच दिवशी आचारसंहिता लागू झाली होती. विधानसभा निवडणुकीच्या धामधुमीत, आचारसंहितेत हा विषय बाजूला पडला. निवडणूक निकाल जाहीर झाल्यानंतर पाच डिसेंबरला मंत्रिमंडळाचा शपथविधी होणार असल्याचे म्हटले जाते. खाते वाटपावरून महायुतीत तीनही पक्षात रस्सीखेच सुरू आहे. हा तिढा सुटल्यानंतर पालकमंत्रिपदावरील दावे-प्रतिदाव्यांचा वेगळा अंक पार पडेल. जलसंपदा मंत्री आणि पालकमंत्र्यांची नियुक्ती होईपर्यंत धरणांतील जलसाठ्याच्या नियोजनाचा विषय पुढे सरकणार नाही, असे खुद्द पाटबंधारे विभागाचे अधिकारी सांगतात.

आकस्मित पाणी आरक्षणासाठीचे प्रस्ताव पाटबंधारे विभागाकडे प्राप्त झाले आहेत. पालकमंत्र्यांअभावी त्यावर निर्णय घेता आलेले नाहीत. संपूर्ण राज्यात कमी-अधिक प्रमाणात ही स्थिती आहे. यंदा पाऊसमान चांगले राहिल्याने बहुतांश भागातील धरणे तुडुंब भरली.

## SPORT

# 36 all out and runaway victories



Adelaide - India play just their fifth-ever pink-ball Test when they face Australia at the Adelaide Oval from December 6 for the second match of the Border-Gavaskar Trophy. This will be India's second day-night Test match away from home, with the previous instance also being at the same venue. That particular match became one that Indian fans would've wanted to forget in a jiffy in its immediate aftermath, but it is now remembered almost fondly because of what came after.

India hosted pink-ball Test matches at three different venues across the country in 2019, 2021, and 2022. Here, we examine how each of their day-night Test matches has gone thus far.

The first-ever pink-ball Test that India played amid much fanfare with the buildup towards the match being akin to the start of a major tournament in Kolkata. It also happened to be pacer Ishant Sharma's 10th Test. Bangladesh had won the toss and chose to bat first. The pacers ruled the roost with Ishant taking five wickets and Umesh Yadav taking three as Bangladesh were all olut for a paltry 106 runs. Captain Virat Kohli scored 136 in 194 balls while Cheteshwar Pujara and Ajinkya Rahane scored half-centuries as India declared on 347/9 in reply. Once again, Bangladesh had no answers to India's pacers as Ishant took four wickets and Umesh took five to dismiss the visitors for 195 runs and India won their first pink-ball Test by an innings and 46 runs.

An iconic Test match for quite a few reasons. India won the toss and chose to bat first. Kohli led the way with a gritty 75 off 180 balls as India were all out for 244. Mitchell Starc took four wickets while Pat Cummins took three. India responded strongly with Ravichandran Ashwin getting a 4-fer and pacers Umesh Yadav and Jasprit Bumrah taking three and two wickets respectively as Australia were all out for 191 runs. India lost a wicket in the Prithvi Shaw at the end of Day 2 but were generally considered to be well ahead in the match. What followed in the first session of Day 3 was the kind of carnage that is rarely seen in Test cricket. India had lost five more wickets for 26 runs in the first hour. They lasted just over three overs after the drinks break and were all out for 36 runs, their lowest-ever Test score and the fourth-lowest in the history of the format. Australia chased down the target of 90 with eight wickets to spare. This was the first Test of the series but India miraculously went on to win two of the next three matches, leading to this match being seen in an entirely different light.

# Yashasvi Jaiswal chases Sachin Tendulkar's record as India gear up for Adelaide Test against Australia





**NEW DELHI :** As Team India prepares for the pink-ball Test match against Australia in Adelaide, opener Yashasvi Jaiswal will have a record to aim for, one that might see him surpass the great Sachin Tendulkar. Jaiswal, who is only 22 years old, is smashing records. The young player dominated the home conditions for the majority of the year before slaying the Aussie conditions in the first Test match in Perth with a brilliant 161. Jaiswal has amassed 1,280 runs so far this year, including three hundreds and seven fifties, at an average of 58.18 and a strike rate of 72.52, with an unbeaten 214 his highest score.

Border-Gavaskar TrophyThe young player needs just 282 more runs to surpass Sachin's record for the most Test runs an Indian has made in a calendar year. With seven hundreds and five fifties, Sachin amassed 1,562 runs at an average of 78.10 in 14 Test matches and 23 innings in 2010. 214 was his highest score. ith 1,788 runs in 11 games and 19 innings at an average of 99.33 in 2006, Pakistani batting great Mohammed Yousuf holds the record for most Test runs in a calendar year.

# D Gukesh vs Ding Liren, World Chess Championship 2024 Game 7 Live: Indian GM aims for second win



**New Delhi -** The battle for the world chess title returns after the second rest day as D Gukesh and Ding Liren resume their rivalry in Singapore on Tuesday (3 December). Both Gukesh and Ding are tied on three points each after the first six matches. The first three matches saw two conclusive results, but the last three matches have been all draws, with both players squandering advantageous positions, which has created some controversy in the chess world. Some chess legends are not impressed with how Indian Grandmaster Gukesh, 18, has played against 32-year-old Liren, the reigning world champion. Former world champion Vladimir Kramnik has said that the ongoing World Chess Championship is not at the level expected from the biggest match in the sport.

# Virat Kohli Set To Break Don Bradman's 76-Year-Old Record In Australia





Australia - Virat Kohli has long been a force to reckon with on Australian soil, boasting an impressive record of seven Test centuries in just 14 matches Down Under. His performances have been instrumental in India's recent successes against the Baggy Greens in their own backyard. As the ongoing Border-Gavaskar series unfolds, Kohli is on the brink of rewriting history books with two monumental records in sight. Kohli entered the current series under pressure after a lackluster display against New Zealand. However, the star batter quickly silenced critics with a scintillating century at the Optus Stadium in Perth. His knock helped India set a mammoth target of 534 for Australia, leading to a commanding 295-run victory as the hosts folded for 238. This innings not only marked Kohli's resurgence but also highlighted his love for the Australian conditions, where he consistently delivers on the grandest stages. The upcoming Adelaide Test could see Kohli surpass Sachin Tendulkar for the most centuries in Border-Gavaskar series history. Both legends currently stand at nine centuries each. A single ton in Adelaide would crown Kohli as the leading century-maker in this fiercely contested rivalry, cementing his legacy in the series. Another historic milestone awaits Kohli in the form of Sir Don Bradman's long-standing record for most international centuries by a visiting batter in a single country. Bradman amassed 11 centuries against England in their own backyard, a record that has stood unchallenged for 76 years.



# Who is the Hyderabad techie getting married to badminton champion PV Sindhu? Meet Venkata Datta

Hyderabad - Looks like wedding bells are ringing for the two-time Olympic medallist badminton player PV Sindhu. As per reports, she is gearing up to tie the knot on December 22 in Udaipur. The former world champion, who sought victory at the Syed Modi International in Lucknow on Sunday, is preparing to tie the knot with Hyderabad-based Venkata Datta Sai, an Executive Director at Posidex Technologies.

In an interview with PTI, the shuttler's father, PV Ramana shared that the two families knew each other but it was only a month ago that everything was finalised. He further added that this was the only possible window as her schedule would become hectic from January. Hence, the two families decided to have the marriage ceremony on December 22. The reception will be held in Hyderabad on December 24. As per reports, the wedding-related festivities will kickstart on December 20.

**Who is Venkata Datta Sai?**

Venkata Datta Sai currently holds the position of Executive Director at Posidex Technologies. As per the information available on LinkedIn, he has completed his Diploma in Liberal Arts and Sciences/ Liberal Studies from the Foundation of Liberal and Management Education. He earned his Bachelor of Business Administration (BBA) in Accounting and Finance from Pune's FLAME University in 2018, followed by a Master's degree in Data Science and Machine Learning from the International Institute of Information Technology, Bengaluru.

Venkata Datta Sai gained professional experience with JSW, where he served both as a summer intern and as an In-House Consultant. Reflecting on his time there, he shared on his LinkedIn profile that his BBA in finance and economics "pales in comparison to managing an IPL team", but admitted to learning a lot from both of these experiences.

Since 2019, Venkata Datta Sai has held the position of Managing Director at Sour Apple Asset Management while also serving as Executive Director at Posidex Technologies. In his roles, he has focused on developing innovative solutions to address complex challenges. His work has enabled critical operations at major banks, including HDFC and ICICI, streamlining processes like instant credit score matching for loans and credit cards.

खाद्य सुरक्षा विभागाचा मोठा निर्णय

# बाटलीबंद पाणी आरोग्यासाठी अतिधोकादायक यादीत

● मुंबई, विशाल कारंडे :



प्रवासादरम्यान आपण बऱ्याचदा बाटलीबंद पाणी खरेदी करतो. घराबाहेर पडताना घरातील पाण्याची बाटली विसरून निघालो तर बाहेर पाण्याची बाटली खरेदी करतो. या बाटलीबंद पाण्याला 'मिनरल वॉटर' किंवा 'पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर' असं संबोधलं जातं. हे पाणी शुद्ध आहे असं आपण मानतो. काही कंपन्या दावा करतात की त्यांनी यात मिनरल्स (नैसर्गिक द्रव्ययुक्त पाणी) मिसळले आहेत. या पाण्याने आपल्याला कुठल्याही प्रकारचं नुकसान होत नाही, असं आपण मानतो. अनेक घरांमध्ये पिण्यासाठी, जेवण बनवण्यासाठी हेच पाणी विकत घेऊन वापरलं जातं. परंतु, बाटलीबंद पाणी पिणाऱ्यांसाठी आणि हे पाणी विकणाऱ्या कंपन्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. भारतीय अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाने म्हटलं आहे की हे पाणी आपल्यासाठी घातक ठरू शकतं. एफएसएसआयने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटरचा अतिधोकादायक खाद्यपदार्थांच्या श्रेणीत वर्गीकरण केलं आहे. त्यामुळे आता या पाण्याची तपासणी करणं अनिवार्य आहे. तसेच या पाण्याचं व ते पाणी विकणाऱ्या कंपन्यांचं ऑडिटही (तपाणसी) केलं जाणार आहे. अलीकडेच केंद्र सरकारने पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर उद्योगासाठी ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्ड्सकडून (बीआयएस) दिलं जाणारं प्रमाणपत्र मिळवण्याची अनिवार्य अट रद्द केली आहे. त्यानंतर एफएसएसआयने हा नवीन निर्णय घेतला आहे. हा निर्णय पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर विक्रेत्या कंपन्यांसाठी मोठा धक्का मानला जात आहे. एफएसएसआयने जाहीर केलेल्या नव्या नियमांनुसार आता सर्व पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर उत्पादकांना एफएसएसआयच्या वार्षिक तपासण्यांना (ऑडिट) सामोरं जावं लागेल. कोणत्याही कंपनीला परवाना मिळवण्यापूर्वी किंवा नोंदणी करण्यापूर्वी ही तपासणी करून घ्यावी लागेल.

## कंपन्यांना तपासण्या करून घ्याव्या लागणार

■ एफएसएसआयने दिलेल्या आदेशांनुसार सर्व पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटर उत्पादनांना अतिधोकादायक खाद्यपदार्थांच्या श्रेणीत वर्गीकृत केलं आहे. तसेच या उत्पादकांना आता एफएसएसआयचं प्रमाणपत्र घ्यावं लागेल. त्याचबरोबर थर्ड पार्टी अन्न सुरक्षा संस्थांकडून वार्षिक ऑडिट करून घ्यावं लागेल.

## या निर्णयाचा सर्वसामान्यांवर काय परिणाम होणार?

■ हा सर्व खटाटोप करण्यामागे सरकारचं एकमेव उद्दीष्ट आहे की सर्वांना स्वच्छ व शुद्ध पाणी मिळावं, लोकांनी खरोखर मिनरल वॉटर मिळावं. पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर व मिनरल वॉटरच्या नावाखाली विकल्या जाणाऱ्या उत्पादनांची सुरक्षा व दर्जा सुधारणं हे सरकारचं उद्दीष्ट आहे. लोकांना सुरक्षित गोष्टी मिळाव्यात व त्यांचं आरोग्य चांगलं राहावं या उद्देशाने सरकारने हे नवे बदल केले आहेत.

# महावितरणच्या अभय योजनेला अत्यल्प प्रतिसाद

३८ लाख थकबाकीदारांपैकी केवळ ६५ हजार ग्राहकांनीच घेतला लाभ

● पुणे, शकील शेख :



बिलाच्या थकबाकीमुळे वीजजोड कायमस्वरूपी तोडलेल्या राज्यातील घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीजग्राहकांसाठी सुरू केलेल्या महावितरणच्या अभय योजनेला ३१ डिसेंबरची मुदतवाढ देण्यात आली आहे.

राज्यात तब्बल ३८ लाख थकबाकीदार असताना या योजनेचा आतापर्यंत केवळ ६५ हजार ग्राहकांनी लाभ घेतला आहे. त्यामुळे अल्प प्रतिसाद असल्याने या योजनेला मुदतवाढ देण्याची नामुष्की महावितरणवर आली आहे. नागपूर परिमंडळातील ७ हजार ५९२, कोल्हापूर परिमंडळातील ६ हजार १०१ आणि पुणे परिमंडळातील ५ हजार ८९३ ग्राहकांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेल्या (पीडी) राज्यातील ३८ लाख ग्राहकांकडून महावितरणला मूळ बिलाची ५ हजार ४८ कोटी रक्कम, तर १ हजार ७१९ कोटी रुपये व्याज आणि ६९ कोटी ९० लाख इतका विलंब आकार बाकी आहे. ही थकबाकी वसूल होण्यासाठी महावितरणने १ सप्टेंबरला अभय योजना अंमलात आणली. त्यासाठी ३० नोव्हेंबरची मुदत देण्यात आली होती. मात्र, या योजनेला अत्यल्प प्रतिसाद मिळाला आहे. आतापर्यंत राज्यातील केवळ ६५ हजार ४४५ वीज ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला असून त्यांच्याकडून ८६ कोटी रुपयांचा भरणा झाला असून त्यांना ४४ कोटी ३५ लाख रुपयांचे व्याज व विलंब आकार माफ झाला आहे. नागपूर परिमंडळातील ७५९२ वीज ग्राहकांनी योजनेचा लाभ घेतला असून हे परिमंडळ पहिल्या क्रमांकावर आहे. कोल्हापूर परिमंडळातील ६ हजार १०१ आणि पुणे परिमंडळातील ५ हजार ८९३ ग्राहकांनी लाभ घेत ही परिमंडळे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर आहेत. महसूल विभागांचा विचार केल्यास नागपूर विभागात २० हजार ४०० लाभार्थी असून कोकण विभागात १७ हजार ७९८ तर पुणे विभागात १७ हजार ४४८ व छत्रपती संभाजीनगर विभागात ९ हजार ८१८ लाभार्थी आहेत.

या योजनेतून पुणे परिमंडलातील २ लाख ५३ हजार ३७४ वीजग्राहकांना फायदा होणार असून मूळ थकबाकीचा भरणा केल्यास व्याज व विलंब आकाराचे एकूण ७३ कोटी १४ लाख रुपये माफ होणार आहेत. मात्र, पुणे परिमंडळातही केवळ ५ हजार ८९३ ग्राहकांनीच याचा लाभ घेतला आहे.

# स्वारगेट ते कात्रज मेट्रो प्रकल्पात होणार बदल!

■ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे केले होते भूमिपूजन

● पुणे, अभिजित येरल्लू :

स्वारगेट ते कात्रज या प्रस्तावित भुयारी मेट्रो मार्गावर बदल करण्याचा निर्णय महामेट्रोने घेतला आहे. या भागातील नागरिकांसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे मेट्रो प्रकल्पाच्या खर्चात २०० ते ३०० कोटी रुपयांनी वाढ होण्याची शक्यता आहे. स्वारगेट ते पिंपरी चिंचवड हा मेट्रो मार्ग कार्यान्वित झाल्यानंतर स्वारगेट ते कात्रज असे मेट्रो मार्गाचे विस्तारीकरण केले जात आहे. या विस्तारित मेट्रो मार्गाचे भूमिपूजन दोन महिन्यांपूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने करण्यात आले. सिव्हील कोर्ट ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचे लोकार्पण झाल्यानंतर स्वारगेट ते कात्रज या भुयारी मेट्रो मार्गाचे भूमिपूजन झाले आहे. या विस्तारीकरणाच्या मेट्रो प्रकल्पात तीन मेट्रो स्टेशन उभारण्यात येणार होती. मात्र लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांची मागणी लक्षात घेऊन या मार्गावर चौथे मेट्रो स्टेशन देखील आता उभारले जाणार आहे. बालाजीनगर येथे हे नवीन स्थानक उभारण्याचा निर्णय महामेट्रोने घेतला असून, यासाठी पुणे महापालिकेने तत्त्वत: मान्यता दिली आहे. या मेट्रो मार्गावर आता तीनऐवजी चार स्थानके होणार असल्याने बालाजीनगर, धनकवडी या परिसरातील प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. नवीन स्थानक उभारताना त्याचा आर्थिक भार महापालिका घेणार नाही, या अटीवर ही परवानगी देण्यात येणार आहे. त्यामुळे या नवीन स्थानकाचा खर्च महामेट्रोला करावा लागणार आहे. स्वारगेट ते कात्रज या मेट्रो मार्गाच्या सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये (डीपीआर) मार्केटयार्ड, पद्मावती, कात्रज अशी



तीन स्थानके प्रस्तावित करण्यात आली आहेत. पद्मावतीनंतर थेट कात्रजला मेट्रोचे स्थानक असल्याने धनकवडी, बालाजीनगर परिसरातील प्रवाशांची अडचण होण्याची शक्यता होती. बालाजीनगर भागात चौथे स्थानक उभारावे, अशी मागणी या भागातील लोकप्रतिनिधींनी महामेट्रोकडे केली होती. तसेच काही वर्षांपूर्वी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत यावर चर्चा होऊन स्थानक उभारण्याचा ठरावदेखील करण्यात आला होता.

या विस्तारित मार्गाचे भूमिपूजन झाल्यानंतर मेट्रो स्थानकाची मागणी जोर धरत होती. नवीन स्थानक करायचे झाल्यास त्यासाठी पालिकेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव महत्त्वाचा असतो. मात्र, यापूर्वी पालिकेच्या सर्वसाधारण सभेत झालेल्या ठरावाला अनेक वर्षे झाल्याने महामेट्रोने पालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याकडे नवीन ठराव करून देण्याची विनंती केली होती. बालाजीनगर येथे नवीन मेट्रो स्थानक उभारण्यास प्रशासनाने तत्त्वत: मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव स्थायी समितीकडे मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. नवीन स्थानक उभारताना त्याचा कोणताही आर्थिक भार महापालिकेवर असणार नाही, अशी अटदेखील यामध्ये घालण्यात आली आहे.

## स्वारगेट-कात्रज विस्तारित मार्गाची वैशिष्ट्ये

- ५.४६३ किलोमीटर लांबीचा मार्ग
- विस्तारित मेट्रोच्या प्रकल्प खर्चासाठी २९५४.५३ कोटी रुपयांना मान्यता
- पुणे महापालिकेचा हिस्सा १८१.२१ कोटी रुपये
- दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानकातील अंतर १.९ किलोमीटर
- धनकवडी, बालाजीनगर, के. के. मार्केट परिसरातील प्रवाशांना सोयीस्कर
- नवीन स्थानकाच्या समावेशामुळे प्रकल्प खर्च २०० ते ३०० कोटींनी वाढण्याची शक्यता

# इतवारी रेल्वेस्थानकाचे रूपडे पालटले 'या' नवीन नावाने...



● नागपूर, नितीन देवळेकर :

देशातील विविध रेल्वेस्थानकांचा पुनर्विकास केला जात असून त्यात नागपुरातील इतवारी रेल्वेस्थानकाचा समावेश आहे. या रेल्वेस्थानकावर पुनर्विकासाचे काम पूर्ण झाल्याने स्थानकाचे रूपडे पालटले आहे. केंद्राच्या अमृत भारत स्टेशन योजनेत देशातील १,३३७ स्थानकांचा पुनर्विकास केला जात आहे.त्यात इतवारी रेल्वेस्थानकाचा (नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी जंक्शन) समावेश आहे. त्यासाठी सुमारे १२.३९ कोटी मंजूर करण्यात आले. आता या स्थानकाचे आता काम पूर्ण झाले आहे. त्यामुळे स्थानक परिसरातील वाहतूक कोंडी कमी झाली आहे. तसेच वाहनतळासाठी जागा उपलब्ध झाली आहे. दरम्यान, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते इतवारी रेल्वेस्थानकाचे 'नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी रेल्वे स्थानक' असे नामकरण करण्यात आले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील १ हजार ५०० रेल्वे भुयारी मार्ग (आरयूबी)चे लोकार्पण तसेच अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत ५५४ विकासकामांचे आभासी पद्धतीने भूमिपूजन झाले. यावेळी आमदार कृष्णा खोपडे, दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या डीआरएम नमिता त्रिपाठी आदींची प्रमुख उपस्थिती होती. मध्य रेल्वेच्या वतीने नागपूर विभागात १३५.४४ कोटी रुपयांचे ३६ भुयारी मार्ग तयार करण्यात आले आहेत. तर अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या १५ रेल्वेस्थानकांचा समावेश असून तीन रेल्वेस्थानकांचे काम पूर्ण झाले आहे.

# निवडणुकीनंतर रस्त्यांवरील खड्डे पुन्हा ऐरणीवर, मनसेने इशारा देताच मनपाची तक्रार निवारण यंत्रणा

● नाशिक, सचिन कदम :

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या धामधुमीत काहीसा बाजूला पडलेला शहरातील खड्ड्यांचा विषय मनसेने पुन्हा ऐरणीवर आणला आहे. पावसाळा संपुष्टात येऊन एक, दीड महिना उलटूनही शहरातील रस्त्यांची दुर्दशा दूर झालेली नाही. खड्ड्यांमुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे. आरोग्याचे प्रश्न कायम आहेत. याविषयी आठ दिवसात कारवाई न झाल्यास मनसे पद्धतीने आंदोलनाचा इशारा पदाधिकाऱ्यांनी दिला. या इशाऱ्यानंतर महापालिकेने




खड्डे व रस्ते दुरुस्तीबाबत तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित केल्याचे सांगत त्यावर कार्यवाही केली जाणार असल्याचे म्हटले आहे. पावसाळ्यात शहरातील रस्त्यांची वाट लागली. विविध कामांसाठी केल्या जाणाऱ्या खोदकामात नंतर योग्यप्रकारे दुरुस्ती केली जात नाही. पावसाने उघडीप घेतल्यानंतर महापालिकेने खड्डे व रस्ते दुरुस्तीसाठी कोट्यवधींच्या कामांना मान्यता दिल्याचे सांगितले जात होते. परंतु, आजही अनेक भागात रस्त्यांची अवस्था बिकट आहे. या पार्श्वभूमीवर, मनसेचे प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, माजी सभागृह नेते दिनकर पाटील, जिल्हाध्यक्ष अंकुश पवार, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे आदींनी मनपा आयुक्तांची भेट घेऊन रस्त्यांसह आरोग्याच्या प्रश्नाकडे लक्ष वेधले.

मनपा हद्दीतील महत्वाच्या रस्त्यांसह कॉलनी रस्त्यांवर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. यामुळे नागरिकांसह वाहनधारकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. मनपाने अनेकदा खड्डे बुजविण्याचे ठेके दिले. परंतु, नावापुरती मलमपट्टी झाल्यामुळे खड्डे पूर्ववत झाले. यामुळे अपघातांना निमंत्रण मिळत आहे. अनेक ठिकाणी अस्वच्छता आहे, यामुळे नागरिकांना आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अनेक भागात पाणी पुरवठा विस्कळीत आहे. या प्रश्नांबाबत वारंवार दाद मागूनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. खड्ड्यांची दुरुस्ती, आजारावर नियंत्रण आणि पाणी पुरवठ्याच्या समस्या आठ दिवसात न सोडविल्यास आंदोलन छेडून धडा शिकवला जाईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला.

# फेंगल चक्रीवादळाचं संकट महाराष्ट्रवरसुद्धा, सहा जिल्ह्यांना ' यल्लो ' अलर्ट

● मुंबई, विशाल पाटील :



फेंगल चक्रीवादळ नावाचे भलेमोठे संकट भारतासमोर उभे झाले आहे. या चकरी वादळाने मोठ्याप्रमाणावर हाहाकार माजवलाय. पुद्दुचेरीमध्ये मोठा कहर बघायला मिळाला. सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक विमाने रद्द करण्यात आली आणि शाळांनी सुट्टी जाहीर केली. अनेक रस्त्यांवर नद्या वाहत असल्यासारखे दृश्य पाहायला मिळाले. या फेंगल चक्रीवादळाचा दुष्प्रभाव महाराष्ट्रामध्येही दिसतोय. सकाळपासूनच वातावरण ढगाळ झालेले दिसतंय. यासोबतच काही जिल्ह्यांमध्ये पावसाची देखील शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अरबी समुद्रावर फेंगल चक्रीवादळाचा कमी दाब आहे. भारतीय हवामान विभागाचे पुण्याचे प्रमुख के. एस. होसाळीकर यांनी याबद्दलची माहिती 'X' वर शेअर केली आहे.

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये ढगाळ वातावरण असून या चक्रीवादळामुळे थंडी कमी झाली. मागील काही दिवसांमध्ये थंडी चांगलीच वाढली होती. सांगली, सातारा, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, धावशिव, वाशिम, हिंगोली, बीड आणि संभाजीनगर या जिल्हांमध्ये पावसाची शक्यता आहे. फेंगल चक्रीवादळ येत्या २४ तासात साध्यापेक्षाही तीव्र होण्याची दाट शक्यता देखील हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे.

फेंगल चक्रीवादळ सध्या भारताच्या दक्षिण किनारपट्टीवर आहे. यामुळेच त्याचा परिणाम वातावरणावर झाल्याचे बघायला मिळतोय . हवामान खात्यासह पंजाबराव डख यांनी देखील फेंगल चक्रीवादळाचा परिणाम महाराष्ट्रामध्ये दिसणार असल्याचे म्हटले. बऱ्याचदा पंजाबराव डख यांनी हवामानाबद्दल दिलेले अंदाज खरे होताना दिसतात. पंजाबराव डख यांचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर बघायला मिळतात. सहा जिल्ह्यांमध्ये फेंगल चक्रीवादळाचा परिणाम ५ डिसेंबरला अधिक राहणार असल्याचे हवामान खात्याकडून सांगण्यात आलंय. गुरुवारी सातारा, पुणे, रत्नागिरी, लातूर, सांगली, कोल्हापूर या सहा जिल्ह्यांना हवामान खात्याकडून यलो अलर्ट देण्यात आलाय.

# १० डिसेंबरला ताडदेव येथील कोळी महिलांचा डी विभाग कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा

● मुंबई, यश सावंत :



ताडदेव येथील कोळी महिलांना न्याय मिळण्यासाठी पालिकेच्या डी विभाग कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा येत्या दि, १० डिसेंबर रोजी आयोजित केला आहे. ताडदेव येथील बेलेसिस ब्रीजच्या नुतनीकरणामुळे शेकडो वर्षांपूर्वी पासून मासेमारी व्यवसाय करणाऱ्या मासे विक्रेत्या कोळी महिलांवर बृहन्मुंबई महानगर पालिकेतील अधिकाऱ्यांकडून होऊ घातलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी बेलासिस ब्रीज ते डी वार्ड कार्यालयावर मच्छिमार जन-आक्रोश मोर्चा धडकणार असल्याची माहिती अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी दिली. कष्टकरी, गरीब, विधवा, हातावर पोट घेऊन जगणारे आणि साठ वर्षांपूर्वी पासून ताडदेव येथील बेलासिस ब्रीज लगत सक्षम व्यवसाय करणारे मासे विक्रेत्या कोळी महिलांना कायमचे उद्ध्वस्त करण्याचा डाव मनपा कडून होत असल्याचा आरोप मच्छिमार समितीकडून करण्यात आला आहे.